रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३३६
www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, २४ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रायगडातील पर्यटनस्थळांवर मनाई आदेश जारी/२
सुधागड पेडली येथे जीपला अपघात; तिघे जखमी/५
विंडीज दौऱ्यासाठी भारतीय संघात युवा खेळाडूंना संधी/८







# भूमिपुत्रांचे दैवत स्व. दि. बा. पाटील यांचा आज स्मृतिदिन

## बेरोजगारांसाठी पनवेलमध्ये महारोजगार मेळावा

### मंत्री उदय सामंत, मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भूमिपुत्रांचे दैवत दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेलमध्ये शनिवारी (दि. २४) महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत आणि राज्याचे उद्योजकता व कौशल्य





विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बेरोजगार उमेदवारांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम शनिवारी सकाळी ९ वाजता आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात होणार आहे.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, कॉ. भूषण पाटील, आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, उपाध्यक्ष जे. डी. तांडेल यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# विरोधकांच्या बैठकीत वादावादी

## केजरीवाल, राहुल गांधी, खर्गे, अब्दुला यांच्यात तू तू मैं मैं!

**पाटणा : वृत्तसंस्था**

देशात भाजपविरोधकांची एकजूट होण्यासाठी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी शुक्रवारी (दि. २३) विरोधी पक्षांची बैठक पाटण्यात बोलावली होती, मात्र या बैठकीत काही नेते एकमेकांना भिडले. त्यामुळे विरोधकांमध्ये फूट दिसून आली.

बैठकीत आम आदी पक्षाने वटहुकुमाच्या मुद्द्यावर काँग्रेसला धारेवर धरल्याने चर्चेमध्ये मिठाचा खडा पडला. काँग्रेसने या बैठकीतच भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी आपचे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केल्याने केजरीवाल आणि काँग्रेस नेते राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांच्यामध्ये संघर्ष झाला.

याचबरोबर आपच्या प्रवक्त्या प्रियंका कक्कड म्हणाल्या की, संसदेत आणण्यात येणाऱ्या सेवा अध्यादेशाविरोधात आम्ही सर्व राजकीय पक्षांचे समर्थन मागितले आहे, मात्र काँग्रेस यावर भूमिका स्पष्ट



करीत नाही. काँग्रेस संविधानासोबत आहे की सत्ताधाऱ्यांसोबत हे त्यांनी स्पष्ट करावे.

याच बैठकीत जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी केजरीवाल यांना फटकारले. केजरीवालांनी, केंद्राकडून आणण्यात येणाऱ्या अध्यादेशाला आम्ही विरोध करतोय. बाकी पक्षांनी आम्हाला समर्थन द्यावे, असे म्हटले. केजरीवाल यांच्या या भूमिकेवर उमर अब्दुल्ला यांनी आक्षेप घेतला. जेव्हा जम्मू काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यात आले तेव्हा तुमच्या पक्षाने आम्हाला समर्थन दिले नाही, असे म्हणत अब्दुला यांनी संताप व्यक्त केला.

बैठकीत उपस्थित नेते एकमेकांना भिडताना पाहून काही ज्येष्ठ पुढे आले आणि त्यांनी मध्यस्थी करून भांडणाऱ्या नेत्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, मात्र विरोधकांमध्ये एकी नसल्याचे यावरून दिसून आले.

दरम्यान, या बैठकीला आमंत्रण न दिल्याने एमआयएमचे नेते ओवैसी भडकले. मी स्पष्टपणे बोलतो, म्हणूनच मला डावलले असल्याचे सांगत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### पाटण्यात विरोधकांचे फोटोसेशन -ना. शाह

**श्रीनगर** : पाटण्यातील विरोधकांच्या बैठकीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निशाणा साधला आहे. विरोधकांची बैठक म्हणजे फोटोसेशन असल्याचा टोला त्यांनी लगावला. कितीही विरोधक एकत्र आले तरी २०२४मध्ये भाजप ३००पेक्षा जास्त जागांवर विजयी होऊन नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील, असा विश्वास गृहमंत्री शाह यांनी व्यक्त केला.

> **विरोधकांच्या बैठकीचा कोणताही परिणाम होणार नाही. सातत्याने मेहबुबा मुफ्ती यांच्या नावाने भाजपला टोमणे मारणारे उद्धव ठाकरे आज त्याच मेहबुबा मुफ्तींच्या बाजूला बसले. त्यामुळे सत्तेसाठी आणि सगळ्या प्रकारच्या तडजोडी करण्यासाठी ते तयार असल्याचे स्पष्ट होते.**
>
> **-देवेंद्र फडणवीस, भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र**

## हेमंत सुताने यांच्यानंतर आता अभिजित पाटलांच्या अटकेकडे लक्ष

**पनवेल : प्रतिनिधी**

कोटयवधी रुपयांच्या कर्नाळा बँक घोटाळ्यातील प्रमुख आरोपींपैकी एक असलेले बँकेचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक हेमंत सुताने यांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यानंतर आता फरारी असलेले संचालक अभिजित पाटील यांना कधी अटक होणार याकडे ठेवीदार व खातेदारांचे लक्ष लागले आहे.

अभिजित पाटील हे कर्नाळा बँक घोटाळ्याचे सूत्रधार शेकापचे माजी आमदार व बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांचे चिरंजीव आहेत. त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज पनवेल येथील न्यायालयाने फेटाळला असून ते फरार आहेत. त्यांनाही अटक करण्याची मागणी कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समितीने केली आहे.

## पनवेलमध्ये 'मोदी @ ९' अंतर्गत आज लाभार्थी संमेलन

### मंत्री मंगलप्रभात लोढा करणार मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारकडून नऊ वर्षांत समाजातील सर्व घटकांसाठी कल्याणकारी कार्य करण्यात आले. त्या अनुषंगाने भाजपतर्फे राबविण्यात येणाऱ्या मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने पनवेल विधानसभा भाजपच्या वतीने शनिवारी (दि. २४) दुपारी १२ वाजता राज्याचे उद्योजकता व कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थी संमेलन होणार आहे.

तक्का येथील श्री संत सावता माळी सभागृहात होणाऱ्या या संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने, मोदी सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांची माहिती देण्यासाठी विकास तीर्थ, डॉक्टर, शिक्षक, वकील, इंजिनिअर यांचे प्रबुद्ध नागरी संमेलन, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मोदी सरकारला सोशल मीडियाच्या माध्यमातून पाठिंबा देणाऱ्यांचे सोशल मीडिया इन्फ्ल्यून्सर संमेलन, विशाल रॅली, जाहीर सभा, योग दिन, ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन, व्यापारी संमेलन, व्हर्च्युअल रॅली, घरोघरी संपर्क अभियान, संयुक्त मोर्चा संमेलन असे विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात होत आहेत. त्या अनुषंगाने या महाजनसंपर्क अभियानातील लाभार्थी संमेलन एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे.

## निवडक

### म्हाडाच्या मुंबईतील घरांसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**मुंबई** : म्हाडाने मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ४०८२ सदनिका नुकत्याच जाहीर केल्या होत्या. या सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडत प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्याकरिता नागरिकांच्या सोयीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुक अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी व अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता आता १० जुलै ही अंतिम तारीख आहे.

### पंतप्रधान मोदींच्या अमेरिका दौऱ्यामुळे भारतात नोकऱ्या

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी ही मोठी उपलब्धी आहे. मायक्रॉन, अप्लाइड मटेरियल्स आणि लॅम रिसर्चसारख्या कंपन्यांनी केलेल्या घोषणेमुळे भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रात खूप विकास होईल. येत्या काही दिवसांत थेट ८० हजार ते एक लाख नवीन नोकऱ्या भारतात येतील, असे केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी म्हटले आहे.

## पंतप्रधान मोदींच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती घरोघरी पोहचवा

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्यकर्त्यांना आवाहन



**खोपोली : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सन २०१४ ते २०२३ या नऊ वर्षांत देशात जनतेच्या कल्याणासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या. या जनकल्याणकारी योजनांची माहिती देण्यासाठी कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन प्रचार आणि प्रसार करावा, असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २३) खोपोली येथे केले.

भाजप महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने कर्जत विधानसभा क्षेत्र संयुक्त मोर्चा संमेलन खोपोलीतील कमलाबेन सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी प्रमुख वक्ते म्हणून आमदार ठाकूर बोलत होते. या संमेलनास विस्तारक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष व आयोजक अश्विनी पाटील, विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, (पान २ वर..)

## सावळे येथे खत, रोपे, वह्यावाटप आणि आधार कार्ड शिबिर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील सावळे येथे शुक्रवारी (दि. २३) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप, स्व. ह.भ.प. तुकाराम महाराज केदारी शेतकरी सन्मान योजनेतंर्गत ५० टक्के सवलतीच्या दरात खत वाटप तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने आधार कार्ड शिबिर व रोपेवाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय टेंबे, सरपंच सुनील माळी, जांभिवलीचे सरपंच रवी कोंडिलकर, सावळेचे माजी सरपंच शिवाजी माळी, प्रशांत माळी, सतीश म्हसकर, उपसरपंच प्रगती जांभुळकर, सदस्य सुरेखा कुरंगळे, रश्मी गाताडे, कविता माळी, ग्रामसेवक सतीश देवकाते, ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती माळी, सदाशिव माळी, रामचंद्र केदारी, कमलाकर माळी, रघुनाथ माळी, विजय कुरंगळे, सुदाम भंडारकर, बाळाराम कुरंगळे, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील नामदेव माळी, गाव अध्यक्ष ओमकार माळी, किरण केदारी, ऋषिकेश माळी, सुरज कांबळे, मनीष माळी, निशांत माळी, युवा कार्यकर्ते शुभ पाटील, मुख्याध्यापक श्री. घोडके, राजेंद्र शिंदे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी सावळे येथील जिल्हा परिषद शाळा आणि ज्ञानवर्धिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. ह.भ.प. तुकाराम महाराज केदारी शेतकरी सन्मान योजनेतंर्गत ५० टक्के सवलतीच्या दरात १२५ बॅग खताचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले, तर ग्रामपंचायतीच्या वतीने झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत १०० रोपांचे वाटप केले गेले. त्याचप्रमाणे आधार कार्ड शिबिर घेण्यात आले. याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला.



# आरोग्य योजनांची समन्वयातून अंमलबजावणी करावी

## केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांची सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्राची आयुष्यमान भारत योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना नागरिकांचा आरोग्यावरील खर्च उचलतात. राज्यातील नागरिकांना या योजनांचा जास्तीत जास्त लाभ देण्यात यावा. यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची समन्वयातून अंमलबजावणी करावी, अशा सूचना केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी शुक्रवारी (दि. २३) दिल्या.

सह्याद्री अतिथिगृहात आयुष्यमान भारत योजनेविषयी आढावा बैठक झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नॅशनल हेल्थ अथॉरिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. गोपालकृष्णन, उपसंचालक रोहित झा, आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव श्री. सोना, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यात दोन्ही योजनांचे एकच कार्ड करण्याच्या सूचना करीत आरोग्य मंत्री मांडविया म्हणाले, केंद्राची व राज्याची



योजना समन्वयाने राबवल्यास केंद्र शासनाचा ६० टक्के निधी मिळतो. राज्याची बचत होते. त्यासाठी भारत सरकार आयुष्यमान केंद्र योजनेला व्यापक स्वरूप देत आहे. समन्वित योजनेतून लाभार्थ्याला त्याच्या आजारावर किती पैसा खर्च केला, याचा संदेश जाणार आहे, तसेच रुग्णालयांना रक्कमही लवकर मिळणार आहे. राज्यात दहा कोटी लाभार्थ्यांकडे हे कार्ड असले पाहिजे. संकेतस्थळावरून लाभार्थी स्वतः आपले कार्ड डाऊनलोड करू शकतो. गावातच त्याला कार्ड मिळेल. गावातील कार्डधारकांची यादी ग्रामसभेकडे असेल.

या योजनेत सर्वच सार्वजनिक रुग्णालयांना जोडावे. रुग्णालयातील काम करणाऱ्या डॉक्टरला यामध्ये प्रोत्साहन भत्ता देता येतो, तसेच आशा सेवकांनी त्यांच्या स्मार्ट मोबाईलच्या माध्यमातून कार्ड बनवून दिल्यास आशा सेवकांना प्रति कार्ड पाच रुपयेदेखील मिळणार आहेत. गावातील आशा कार्यकर्ती यांना गावातील लाभार्थ्यांची यादी पोहचवावी. प्रत्येक सहभागी रुग्णालयात आयुष्यमान भारतचा किऑस्क असावा. किऑस्कमधून लाभार्थ्यांना योजनेविषयी संपूर्ण सुविधा दिली जाईल. कोविड काळात अखर्चित असलेला निधी राज्याच्या आरोग्य विषयक मूलभूत सुविधा उभारण्यासाठी वापरावा. नॅशनल हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशनमधून प्रत्येक जिल्ह्याला निधी देण्यात येत आहे. या निधीतून वैद्यकीय सोयीसुविधा भक्कम कराव्यात.

### एकत्रित कार्ड वितरण कार्यक्रम राबवावा –उपमुख्यमंत्री

**प्रधानमंत्री जनआरोग्य व महात्मा फुले जनआरोग्य योजना समन्वयातून राबविल्यास राज्याची आरोग्य यंत्रणा बळकट होणार आहे. यामुळे लाभार्थ्यांना अधिकचा लाभ देणे शक्य होईल. राज्यात सार्वजनिक रुग्णालय एकत्र आणून त्यांच्यासाठी प्रोत्साहन निधी देण्याची योजना तयार करावी. आयुष्यमान भारत डिजिटल मिशन राज्यात प्रभावीपणे राबविण्यात यावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा बैठकीत दिल्या.**

## रायगडातील पर्यटनस्थळांवर मनाई आदेश जारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळा सुरू झाल्यानंतर माणगावातील भिरा गावचे हद्दीतील देवकुंड धबधबा, सणसवाडी गावचे हद्दीतील सिक्रेट पॉईंट व ताम्हिणी घाट हा परिसर पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. ही ठिकाणे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी १४४अन्वये मनाई आदेश माणगाव उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी यांनी १० जून ते ३१ ऑक्टोबर या कालावधीसाठी जारी केला आहे.

ताम्हिणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याचा संभव असल्याने पर्यटकांची वित्त व जीवितहानी होऊ शकते. या कारणांमुळे देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हिणी घाट ही पर्यटन स्थळे पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित नसल्याने या परिसरात मद्यपान करणे, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढणे, धबधब्याच्या वरील बाजूला जाणे, रहदारीच्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे. वाहने अतिवेगाने व वाहतूक निर्माण होईल अशा प्रकारे चालविणे, सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, अशा प्रकारचे वर्तन केल्यास प्रशासनाने कारवाईचा इशारा दिला आहे.

## मालमत्ता कर भरून सहकार्य करणाऱ्या औद्योगिक संस्थेचा सन्मान

**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर येथील भारत पेट्रोलियमने आपला एक कोटी १० लाख ९६ हजार रुपयांचा मालमत्ता कर भरल्याबद्दल पनवेल महापालिकेचे उपायुक्त गणेश शेटे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानले.



पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा, नवीन पनवेल या सर्व भागांतून गेल्या महिनांभरापासून विविध औद्योगिक संस्था तसेच निवासी मालमत्ताधारक लाखोंच्या घरात असलेला आपला मालमत्ता कर भरत आहेत. यामध्ये मुख्यत्वाने भारत पेट्रोलियम , टाटा स्टील, सेंट्रल ऑईल, जी न्ड टी ऑईल स्टेट इंडस्ट्रिज,सकाळ पेपर्स, धारक एन सुंदरलाल अँड कंपनी तसेच निवासी मालमत्ताधारकांमध्ये भूमी गार्डनिया को. ऑप हाऊसिंग सोसायटी, ज्वेल एकविरा, गुडवील पॅराडाईज,पायल हाईट्स को. ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, गॅलेक्सी को. ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, निसर्ग आर्केड को. ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी या सर्वांनी आपला लाखोंचा मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य केले आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरुन महापालिकेच्या विकासाला हातभार लावावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

## 'दिबां'च्या स्मृतिदिनानिमित्त कोरपखैरणेत आज चर्चासत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त शनिवारी (दि. २४) सायंकाळी ६ वाजता आगरी–कोळी युथ फाउंडेशनच्या वतीने उद्योजकता आणि रोजगार निर्मितीच्या पार्श्वभूमिवर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील सागरी भूमिपुत्रांमध्ये उद्योजकता आणि रोजगार निर्मितीची उपलब्ध साधने आणि काय सागरी भूमिपुत्रांचे चेम्बर ऑफ कॉमर्स आजच्या काळाची गरज? हा असणार आहे. मोरेश्वर पाटील सभागृह, पहिला माळा, शेतकरी समाज मंदिर, कोपरखैरणे स्टेशनजवळ, नवी मुंबई येथे ही चर्चासत्र होणार असून या शिबिराला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक आगरी–कोळी युथ फाउंडेशनने केले आहे.

## मोडकळीस आलेल्या बसचे टॉयलेटमध्ये रुपांतर

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत आमदार मंदा म्हात्रे यांच्या टाकाऊपासून टिकाऊ या संकल्पनेतून मोडकळीस आलेल्या चार बसेसचे रूपांतर महिला व पुरुषांकरिता टॉयलेट बनविण्यात आले आहे. या दोन बसेसचे उद्घाटन आयुक्त राजेश नार्वेकर व माजी महापौर जयवंत सुतार, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांच्या हस्ते झाले.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, जुईनगर हायवे लगत लांब पल्ल्याच्या खासगी बसेस उभ्या असतात व नवी मुंबईतील असंख्य नागरिक हे सायन–पनवेल हायवे मार्गाने प्रवास करतात जेणेकरून विशेषत: येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रियांसाठी तिथे शौचालायची व्यवस्था नसते.

त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला पुरुष यांच्यासाठी सर्व सुविधायुक्त अत्याधुनिक बस टॉयलेट व्हावे म्हणून माझ्या आमदार निधीमधून शुक्रवारी नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागामधील मोडकळीस आलेल्या चार बसेसचे रुपांतर टॉयलेटमध्ये करून महिला व पुरुषांसाठी दोन बसेसचे लोकार्पण झाले. अजून सायन–पनवेल हायवे लगत जिथे नागरिकांची मोठ्या संख्येने प्रवासांची ये–जा असते त्या ठिकाणी २० बसेसची व्यवस्था व प्रत्येक ठिकाणी सुरक्षारक्षकाची नेमणूक केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिका आयुक्तांनी अजून अशा जुन्या बसेसची गरज लागेल त्या वेळी महापालिकेच्या वतीने मोडकळीस आलेल्या बसेस उपलब्ध करून दिल्या जातील, असे सांगितले.

या वेळी शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा विभाग उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, महामंत्री निलेश म्हात्रे, डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, माजी नगरसेवक काशीनाथ पाटील, ॲड. सुहास वेखंडे, जगन्नाथ जगताप, पांडुरंग आमले, गुणाबाई सुतार, जयश्री चित्रे, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांच्याकडून कामोठ्यातील कोहिनूर सोसायटी प्लॉट नं. १८, सेक्टर १० येथे झाडे लावण्यात आली. या वेळी चेअरमन विशाल घोडके, नायर, कमलेश उपस्थित होते.**



**पनवेल : कळंबोली भाजप कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी कळंबोली मंडळ अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम उत्तर भारतीय मोर्चाचे मंडळ अध्यक्ष केशव यादव, मंडळ उपाध्यक्ष विनोद बोरसे, भटके विमुक्त आघाडीचे मंडळ अध्यक्ष आबा घुटुकडे, शरथ कुमार आदी उपस्थित होते.**

पान १ वरून

## पंतप्रधान मोदींच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती घरोघरी पोहचवा

जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव, पनवेलचे माजी नगरसेवक तथा अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, खोपोली महिला मोर्चा अध्यक्ष शोभा काटे यांच्यासह कर्जत, खालापूर, खोपोली येथील विविध सेलचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रात भाजप सरकार येण्यापूर्वी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला होता. शंभरपैकी पंधराच टक्के लाभार्थींच्या हातात पडत असे विधान तत्कालीन काँग्रेस नेत्यांनी केल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाषणात सांगून म्हटले की, पंतप्रधान मोदींनी देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारास आळा बसला. नोटाबंदी केल्यामुळे देशातील गैरप्रकार बंद झाले. पंतप्रधान मोदींनी स्वतःला जनसेवक मानले. म्हणून संसदेत प्रथमतः प्रवेश करताना त्यांनी इमारतीच्या पायरीवर नतमस्तक होऊन अभिवादन केले होते. पंतप्रधान झाल्यापासून त्यांचे कुटुंब त्यांच्यापासून दूर होते. यावरूनच पंतप्रधान मोदी यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाला समर्पित केल्याचे दिसून येते, असे सांगितले.

कोरोना काळात प्रतिबंधक लस भारतात तयार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. आपल्या देशालाच नव्हे; तर अन्य देशांनाही त्यांनी कोविड लस पुरवल्यामुळे लाखोंचे प्राण वाचले. या महामारीच्या काळात अनेकांचा रोजगार बुडाला. म्हणून सर्वसामान्यांसाठी मोफत धान्य पुरविण्यात आले. देश–विदेशात भारताचे नाव उज्ज्वल करण्यामध्ये पंतप्रधान मोदी यांचा सिंहाचा वाटा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती घरोघरी पोहचवण्याची जबाबदारी घ्यावी, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील व चिटणीस गोपाळ बावस्कर यांनी केले. पाटील यांनी प्रास्ताविक भाषणात संमेलन आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. या वेळी विस्तारक अविनाश कोळी व माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी या अभियानाची विस्तृतपणे माहिती देऊन कार्यकर्त्यांनी अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

संमेलनाचे सूत्रसंचालन युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुलकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी मानले. या संमेलनाला कर्जत व खालापूर तालुक्यातील विविध सेलचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे परिमंडळ येथे महापारेषणच्या क्षेत्रीय पुरस्कारांचे वितरण



**पुणे : प्रतिनिधी**

महापारेषण कंपनीच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे परिमंडळात बुधवारी (दि. २१) प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह पिंपरी चिंचवड येथे क्षेत्रीय पुरस्कार वितरण सोहळा झाला.

सोहळ्याला महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) संदीप कलंत्री प्रमुख अतिथी म्हणून तर मुख्य महाव्यवस्थापक (मास) सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, महेश आंबेकर, मुख्य अभियंता राजेंद्र पवार, विशेष अतिथी म्हणून तसेच महापारेषण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र गायकवाड अध्यक्ष म्हणून लाभले होते. या वेळी पुणे परिमंडळातील अधीक्षक अभियंता जयंत कुलकर्णी, प्रकाश कुरसंगे, सतीश गायकवाड, प्रमोद भोसले, राम शेळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मास) प्रशांत चौधरी, मिलिंद घोलप, सहाय्यक मुख्य दक्षता अधिकारी सुभाष भिलारे यांचेसह पुणे परिमंडलातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. हास्यसम्राट दीपक देशपांडे यांचा हास्यकल्लोळ हा एकपात्री प्रयोग सादर झाला. क्षेत्रीय पुरस्कारांमध्ये मगरपट्टा सब स्टेशन, थेऊर सबस्टेशन, सांगोला सब स्टेशन, सणसवाडी सब स्टेशन, लाईन मेंटेनन्स सबडिव्हिजन पुणे, बारामती तसेच ईएचव्ही प्रोजेक्ट सब डिव्हीजन पुणे, ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन पंढरपूर, लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन हिंजवडी, ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन बारामती, टेस्टिंग टीम, सिव्हिल टीम, हॉटलाईन टीम, पीआयडी टीम व एसआय युनिट यांचाही गौरव करण्यात आला.

उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांचेही ट्रॉफी, सर्टिफिकेट देऊन कौतुक करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तूंचे प्रातिनिधिक स्वरूपात अनावरण करण्यात आले.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक २६ सन २०२३–२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन – ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५– २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चिंचवळी ते आतोणे फाटा ते रामा. १७ ते खांब नडवली, देवकान्हे, सांगडे, धामणसई, सोनगांव, पिंगळसई ते रामा. ९३ (अष्टमी) रस्ता प्रजिमा ८७ कि.मी ०/०० ते २४/८०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | ५७९७९३० | ५८००० | ११८०/– | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | बोडी ठाणे उलवा रेवस रेड्डी रस्ता प्ररामा ४ कि.मी. ३२७/०९५ ते ३३२/०९५ ३४८/६९५ ते ३५३/६९५, ३६२/६९५ ते ३६६/१९५ मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | ४२०१६६७ | ४३००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | म्हसळा तळवडे रस्ता प्रजिमा– ७३ कि.मी ०/०० ते ४/५०० व ६/०० ते १०/०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल करणे, ता. म्हसळा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | ३०३३५७७ | ३१००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच व वरील |
| ४ | कामत गोळावाडी दुरटोली प्ररामा ५ ते पहूर फाटा ते प्रजिमा ३८ प्रजिमा ७७ कि.मी ०/०० ते १२/५०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | ३१४२७१३ | ३२००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच व वरील |
| ५ | देहेन पाष्टी पांगळोली रस्ता प्रजिमा ७६ कि.मी. ०/०० ते ८/४०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. म्हसळा. जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २९३२७७० | ३०००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | नेवरुळ कोकबल सांगवड तोराडी बंडवाडी रस्ता प्रजिमा ७५ कि.मी ०/०० ते ८/०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. म्हसळा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २०२५२२५ | २१००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | बागमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रामा १०० कि.मी १६/५०० ते १८/५०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. म्हसळा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | १४३४५९३ | १५००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग सहा व वरील |
| ८ | रा.म.मा ४ ते खालापुर पाली रोहा आगरदांडा रस्ता रामा. ९३ कि.मी. ६६/३५० ते १०५/३५० या रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | ३५५३३७१ | ३६००० | ५९०/– | १२ महिने | वर्ग पाच व वरील |
| ९ | फल्याण वावे जांभुळपाडा सुतारवाडी येरळ जामगांव पाथरशेत रस्ता ३८/८०० ते ५६/१७० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा. जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | १०३७८६८ | ०/– | ५९०/– | १२ महिने | म.स.स. |
| १० | प्ररामा ५ ते भुवनेश्वर निवी तळाघर वाशी विष्णूनगर किल्ला अशोकनगर रस्ता प्रजिमा ७१ कि.मी. ०/०० ते ९/४०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २३७५३९२ | ०/– | ५९०/– | १२ महिने | म.स.स. |
| ११ | तांबडी सवाणे मोहरे रस्ता प्रजिमा ८० कि.मी. ११/०० ते २२/५०० या रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २५८०१४१ | ०/– | ५९०/– | १२ महिने | म.स.स. |
| १२ | मुरुड रोहा कोलाड पुणे रस्ता प्ररामा ५ कि.मी. ५४५ / ७५५ ते ५९५ / ६९५ या रस्त्यामधे एक वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २९८२८९३ | ०/– | ५९०/– | १२ महिने | म.स.स. |
| १३ | रा.म.मा १७ ते कोलाड कामथ येरळ मार्ग प्रजिमा ७८ कि.मी ०/०० ते १२/५०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, ता. रोहा, जि. रायगड **(एक वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम)** | २५१५८०० | ०/– | ५९०/– | १२ महिने | म.स.स. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२८/०६/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०६/०७/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यत |
| २ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१०/०७/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप:–** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२८२७

दिनांक : २२/०६/२०२३

**सही/–**

**(एम. आर. नामदे)**

**कार्यकारी अभियंता**

**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# पनवेल शहरातील बेवारस वाहनांवर कारवाई सुरू

## ■ ३४५ बेवारस वाहनांची नोंद ■ १० वाहनांचे स्थलांतरण

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिका कार्यक्षेत्रात पथपदांवर उभी असलेली नादुरूस्त व पडीक दुचाकी, चारचाकी बेवारस वाहनांवर आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या सूचनेनुसार महानगरपालिकेच्या वतीने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

या कामासाठी महापालिकेने ठेकेदाराची नेमणूक केली आहे. महापालिका हद्दतील चारही प्रभागांमधील सार्वजनिक रस्त्यांवरील बेवारस वाहनांचे सर्वेक्षण करण्यात आले असून या वाहनांवर सात दिवसांची नोटीस चिकटविण्यात येत आहे. सात दिवसांमध्ये संबधित वाहन मालकाने वाहन न नेल्यास, वाहनांचे टोईंग करून महापालिकेने निश्चित केलेल्या यार्डमध्ये वाहन नेले जाईल.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सहकार्याने या वाहनमालकाचा शोध घेऊन, वाहनमालकास वाहन घेऊन जाण्यासाठी ४५ दिवसांची नोटीस देण्यात येईल. या दरम्यान वाहन मालक वाहन घेऊन जाण्यास उपस्थित झाल्यास त्यास महापालिकेने वाहनाच्या प्रकारानुसार निश्चित केलेल्या दंड रकमेचा भरणा केल्यानंतर संबंधित वाहन मालकास वाहन सुपूर्द करण्यात येईल. ४५ दिवसात जर वाहनमालकाने वाहन नेले नाही, तर पुन्हा एकदा सात दिवसाची नोटीस देण्यात येईल. या नोटीसीची दखल वाहनमालकाने न घेतल्यास या वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मुल्यांकन करण्यात येईल. त्यानंतर या वाहनांचा लिलाव महापालिकेमार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

पनवेल महापालिकेने आतापर्यंत केलेल्या सर्वेक्षणानुसार पालिका हद्दीत सार्वजनिक रस्त्यांवरील सुमारे ३४५ बेवारस वाहनांची नोंद झाली आहे. यामध्ये दुचाकी, रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, जड वाहने, बस यांचा समावेश आहे. प्रभाग कार्यालयामार्फत वाहनांवरती नोटीसा चिटकविण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे १० वाहनांवर वाहने स्थलांतरणाची कारवाई करण्यात आली आहे.



# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी मशीन पुन्हा सज्ज

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी मशीन आता रुग्णांच्या सेवेस पुन्हा सज्ज झाले आहेत. त्यामुळे रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दोन सोनोग्राफी मशीन गेल्या काही महिन्यांपासून पडून होत्या. रेडिओलॉजिस्ट नसल्याने रुग्णांना बाहेर जाऊन सोनोग्राफी करावी लागत होती. खासगी सेंटरवर जास्त पैसे मोजावे लागत होते. विशेष करून गरोदर महिलांना सोनोग्राफीसाठी बाहेर जावे लागत होते. पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन ऑपरेट करण्यासाठी रेडिओलॉजिस्ट डॉक्टर मिळावा या अनुषंगाने वारंवार मागणी होत होती. तगादा लावल्यामुळे शेवटी रुग्णालयात रेडिओलॉजिस्ट डॉक्टर देण्यात आले आहेत.

### लवकरच सिटीस्कॅनची सुविधाही

**आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने खासगी एजन्सीच्या माध्यमातून पनवेल उपजिल्हा रुग्णालयामध्ये सिटीस्कॅनची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. २००० चौरस फुटाची जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे. नियुक्त करण्यात आलेल्या कृष्णा डायग्नोस्टिक या एजन्सीमार्फत मशिन, तंत्रज्ञ, रेडोलॉजिस्ट त्याचबरोबर इतर मनुष्यबळ पुरवण्यात येणार आहे.**

# पनवेल मनपा हद्दीतील जुने विद्युत पोल हटविले

## भाजपच्या पाठपुराव्याला आले यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग क्र. १७ आणि २०मधील नर्मदा कॉम्प्लेक्स पाण्याच्या हौदापासून ते पनवेल रेल्वेस्टेशन रस्त्याच्या कडेला असलेले लाईटचे जुने पोल खराब झाले होते. त्यामुळे माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बुथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात यांनी पनवेल महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून नर्मदा कॉम्प्लेक्स पाण्याच्या हौदापासून ते पनवेल रेल्वेस्टेशन रोडपर्यंत नवीन लाईटचे पोल महानगरपालिकेतर्फे लावण्यात आले.





यासाठी माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, चारुशिला घरत, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, राजूभाई बगाटे यांनी सहाकार्य केले. रहिवाशांनी या सर्व लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

भाजप अनुसूचित जाती मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, भाजप अनुसूचित जाती मोर्चा रायगड जिल्हा उपाध्यक्ष अरुण सोलंकी, सचिव प्रभाकर पवार, पनवेल शहर अध्यक्ष श्याम साळवी, संजय जाधव अशोक आंबेकर जरीना शेख नंदा टापरे कविता गुप्ता यांनी नवीन पोल बसविण्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

# ‘नवोदय’च्या प्रवेश परीक्षेत आरोही रायगडमधून प्रथम

**पनवेल : वार्ताहर**

केंद्र सरकारच्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया परीक्षेत कामोठे येथील आरोही रुक्मिणी ललित कुमार धायगुडे हिने रायगड जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



रायगडातील माणगाव तालुक्यात नवोदय केंद्रीय विद्यालय आहे. जवाहर नवोदय विद्यालय ही १०० टक्के केंद्रशासन अनुदानित विद्यालय आहेत. मनुष्यबळ विकास मंत्रालयाद्वारे राबविली जातात. दरवर्षी फक्त ८० विद्यार्थ्यांना या शाळेत प्रवेश दिला जातो. यात प्रवेशासाठी कमालीची स्पर्धा असते. त्याकरीता प्रवेश परिक्षा घेतली जाते. अतिशय आव्हानात्मक असलेल्या या परिक्षेच्या गुणवत्ता यादीत येणारे विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेतात. काही दिवसांपूर्वी याकरता प्रवेश परीक्षा घेण्यात आली. यामध्ये रायगड जिल्ह्यात कामोठे येथील आरोही रुक्मिणी ललित कुमार धायगुडे या विद्यार्थिनीने गुणवत्ता यादी प्रथम स्थान मिळवले. विशेष म्हणजे आरोही सर्वसाधारण प्रवर्गातून टॉपर आली आहे.

कामोठे येथील प्रख्यात दंतचिकित्सक डॉ. रुक्मिणी धायगुडे व मंत्रालयातील कक्ष अधिकारी डॉ ललित कुमार धायगुडे यांची आरोही ही कन्या आहे. खारघर येथील विश्व ज्योत हायस्कूलची ती विद्यार्थिनी आहे. आरोहीच्या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



**पनवेल : प्रखर हिंदूराष्ट्रवादी, भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजप तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी तसेच प्रशांत खानावकर, दत्ता राजे, अशोक आंबेकर, अभिमन्यू डौलकर, प्रवीण ठाकूर, हरी घरत उपस्थित होते.**




**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त या कालावधील सरकारने जनहितासाठी राबविलेल्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी पत्रक तयार करण्यात आले आहे. हे पत्रक घराघरात देण्याचे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कार्यकर्त्यांना केले. या वेळी तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## उरण नगरपालिकेतर्फे स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर**

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार उरण नगर परिषदेमार्फत स्वच्छता अभियान शुक्रवारी (दि. २३) घेण्यात आले. शहरातील आनंद नगर वीर सावरकर मैदान ते राजपाल नाका या परिसरात स्वच्छता करण्यात आली.

या वेळी मुख्याधिकारी राहुल इंगळे, बांधकाम अभियंता झुंबर माने, रचना सहाय्यक सचिन भानुसे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, प्रशासकीय अधिकारी अनिल जगधनी तसेच उरण नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. अभियानात आनंद नगर वीर सावरकर मैदान, राजपाल नाकायेथून साधरण २० टन कचरा उचलण्यात आला. बॅनर हटवण्यात आले. रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यात आले. रस्त्यावर आलेल्या धोकादायक झाडांच्या फांद्या तोडण्यात आल्या.




# पनवेलमध्ये दाखले वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील तालुका क्रीडासंकुलात आयोजित केलेल्या दाखले वाटप शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेक नागरिकांनी याचा लाभ घेत दाखले काढून घेतले.

शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अंतर्गत शासकीय कामांसाठी, अ‍ॅडमिशनसाठी अत्यावश्यक असणाऱ्या दाखल्यांच्या वाटप शिबिराचे आयोजन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले होते.



या वेळी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्रीनंद पटवर्धन, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, सोशल मीडिया सेलचे शहर संयोजक प्रसाद हनुमंते, दिपक दुर्गे, महेश सरदेसाई, प्रसाद कंधारे, विनीत मढवी, अजय तायडे, विजय डिसोझा, तलाठी शंकर तवर, रशीला पाटील, सुवर्णा पवार, मधुकर ढवळे, प्रवीण सानप यांच्यासह इतर पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# दिघाटी येथे सोमवारी विकासकामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या डोंगरी विकास अंतर्गत संजय कडू ते बापूजी देव आणि गजानन ठाकूर ते गुरूनाथ ठाकूर रस्त्याचे भूमिपूजन व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे शालेय वह्यावाटप कार्यक्रम सोमवारी (दि. २६) आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमादर प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेल तालुका भाजपचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, पं. स. सदस्य तनुजा टेंबे, दिघाटी सरपंच रजनी ठाकूर, केळवणे जि. प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, भाजप नेते बाळुशेठ पाटील, चांगाजीशेठ पाटील, केळवणे पं. स. विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, माजी उपसरपंच विद्याधर जोशी, माजी उपसरपंच दत्ताशेठ पाटील, विद्यमान सदस्या शितल श्याम पाटील, माजी सदस्य मनोहर पाटील, वैशाली पाटील, स्मिता ठाकूर, माजी अक्षता पाटील, हर्षदा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित राहणार आहेत.

# खारघरमध्ये विकसित होणार पहिले मनोरंजन उद्यान

**पनवेल : वार्ताहर**

खारघर-तळोजा कॉलनीज् वेल्फेअर असोसिएशन यांनी खारघर सेक्टर ३५मधील साई हरिद्रा आणि साई वंडरसमोर पनवेल महानगरपालिकेच्या मोकळ्या भूखंड क्रमांक १चे संवर्धन आणि विकासासाठी सातत्याने केलेले प्रयत्न आणि पाठपुरावा अखेर फळाला आला आहे. पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख आणि उपायुक्त कैलास गावडे यांनी ही जागा महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील पहिल्या मनोरंजन उद्यानासाठी आयकॉनिक प्रकल्प म्हणून विकसित करण्याच्या योजनेला मान्यता दिली आहे.

**पनवेल महापालिकेची मान्यता**

या ठिकाणी पनवेल कार्यक्षेत्रातील प्रत्येक नोडच्या हेरिटेजचा उल्लेख करणारी टॉय ट्रेन असेल, तसेच या उद्यानात रहिवाशांसाठी एक दिवसाचे पिकनिक स्पॉट ठेवण्यासाठी इतर विविध मनोरंजन कार्यक्रम असतील. हे उद्यान किमान शुल्क आकारणीवर असेल. मैदानात मॉर्निंग वॉकसाठी जागा निश्चित केली जाईल आणि व्हॉलिबॉलचे खुले मैदान असणार आहे. या प्रकल्पासाठी सहा कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

याबद्दल मंगेश रानवडे, इम्तियाज शेख, गिरीश दिवेकर, ज्योती नाडकर्णी, श्री चंद्रप्रकाश, मेजर नायर, सैफुल्ला खान आणि अनेक रहिवाशांनी महापालिकेकडेकडे सक्रियपणे पाठपुरावा केला होता. या नवीन उपक्रमाबद्दल पनवेल महानगरपालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# ‘सीकेटी’त आंतरराष्ट्रीय अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त अतिथी चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तथा अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, नवी मुंबई पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २३) अतिथीसत्राचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडतताना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एन. परकाळे यांनी आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ सेवन आणि तस्करी विरोधी दिन का साजरा केला जातो याविषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग नेहमीच तत्पर असतो, तसेच संस्थेच्या मार्गदर्शन आणि सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी, अमली पदार्थांचा गैरवापर आणि बेकायदेशीर तस्करीचा युवक-युवतींवर होणाऱ्या परिणामांबाबत भाष्य करून तत्सम बाबींपासून नेहमी दूर राहण्याचा सल्ला दिला. पीएसआय विजय शिंदे यांनी, विद्यार्थ्यांना प्रबोधनपर चित्रफित दाखविली तथा अमली पदार्थांचे सेवन तथा त्याची विक्री केल्यास होणाऱ्या शासनाबाबत जागरूक केले. यासोबत अमली पदार्थांच्या व्यसनाधिनतेच्या प्रवासाचे वर्णन करणाऱ्या केसवर चर्चा केली.

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शीतल बीडकर यांनी, युवकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांवर भाष्य केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. शेवटी महाविद्यालयाच्या मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी विद्यार्थीकेंद्रित आणि प्रबोधनपर अतिथी सत्राचे कौतुक करून विद्यार्थ्यांना अमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबद्दलचे मार्गदर्शन केले. या वेळी पोलीस हवालदार श्री. आहिरे, अमलान मुखर्जी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले.

अतिथी सत्राच्या आयोजनासाठी रा.से.यो. विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. कीर्ती वर्मा आणि प्रा. अभिजित हिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय

# कुटुंबबचाव बैठक

आता २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरही विरोधकांची स्थिती जराही पालटलेली नाही. सत्ता काबिज करण्यासाठी पुन्हा घायकुतीला आलेल्या या मंडळींनी रणनीती आखण्यासाठी बैठका घेणे सुरू केले आहे खरे, पण त्यांचा परस्परांवर किती विश्वास आहे आणि त्यांची एकजूट किती काळ टिकते हे येणारा काळच दाखवून देईल. भाजपविरोध आणि पंतप्रधान मोदी यांचा द्वेष याखेरीज आजही त्यांच्याकडे अन्य मुद्दा नाही.

**लोकसभा निवडणुकीसाठी एव्हाना वर्षभराचा अवधी आहे, परंतु सत्तेपासून फार काळ दूर राहू न शकणारी व त्याच कारणामुळे २०१४पासूनच कमालीची अस्वस्थ असलेली विरोधीपक्षांतील काही मंडळी आता अगदी घायकुतीला आली आहेत. २०१४मध्ये देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले आणि तेव्हापासून 'सब का साथ, सब का विकास' या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन देशाची वाटचाल सुरू झाली. मोदींनी अनेक महत्त्वाचे निर्णय मोठ्या ताकदीने घेतले. त्यांच्या कामाच्या झपाट्यामुळे दिवसेंदिवस त्यांच्या चाहत्यांची संख्या वाढतच गेली, परंतु त्यांच्या 'न खाऊंगा, न खाने दूँगा' या नीतीमुळे विरोधकांची मात्र कोंडी झाली. प्रदीर्घ भ्रष्टाचारी राजवटीला कंटाळलेल्या जनतेला, पंतप्रधानपद यशस्वीरित्या सांभाळेल असा कोणताही नेता विरोधीपक्षात नसल्याचे तीव्रतेने वाटले आणि अर्थातच त्याचा फायदा २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला झाला. देशात आता मोदींची लाट नाही अशी आवई उठवण्याचा प्रयत्न २०१९च्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी करून पाहिला, पण तो त्यांच्यावरच उलटला. पुलवामा हल्ल्यानंतर बालाकोटमध्ये घुसून भारतीय हवाई दलाने एअर स्ट्राईक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा निर्णयही लोकांच्या पसंतीस उतरला. देशभक्ती आणि दहशतवाद हे मुद्दे निवडणुकीच्या प्रचाराचे प्रमुख मुद्दे बनल्यानंतर विरोधकांकडे सरकारविरोधात बोलण्यासारखे काही उरलेच नाही. आता पुन्हा विरोधकांची एकजूट करण्यासाठी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी ते सातत्याने प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांच्या गाठीभेटी घेत आहेत. याच आट्यापिट्याचा भाग असलेली विरोधकांची एक बैठक शुक्रवारी पाटणा येथे पार पडली. मोदी द्वेषाची कावीळ झालेल्या विरोधकांनी या बैठकीत पुन्हा एकदा 'मोदी हटाव'चा नारा दिला आहे. याचा समाचार घेताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही बैठक 'मोदी हटाव' नव्हे तर 'परिवार बचाव' बैठक आहे. देशातील सगळे परिवारवादी पक्ष या बैठकीसाठी एकत्र आले असून आपल्या परिवाराकडे पुन्हा सत्ता कशी आणता येईल एवढा एकच विचार असलेली ही नेतेमंडळी आहेत अशी टीका केली आणि ती रास्तच आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये विरोधकांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. सरकारच्या ध्येयधोरणांमध्ये काही चुकीचे असेल तर ते दाखवून देण्याची व त्यासाठी आवश्यक तिथे टीका करण्याची जबाबदारी संविधानानेच विरोधीपक्षांवर सोपवलेली आहे, परंतु २०१४पासून देशातील जनतेचे मोठे समर्थन पंतप्रधान मोदी यांना मिळत असताना विरोधकांकडे मात्र मोदीविरोधाखेरीज बोलण्यासारखा अन्य कोणताही मुद्दा नसावा हे या लोकशाही देशाचे दुर्दैवच म्हटले पाहिजे. याच मुद्यावर एकत्र येण्याचा प्रयत्न विरोधकांनी या आधीही करून पाहिला आहे, परंतु देशाची जनता मोदीजींच्या सोबत आहे. विरोधकांनी अशा कितीही बैठका घेतल्या तरी देशातील जनता मोदींसोबतच राहणार आहे हे येणारा काळ दाखवून देईलच.**

# भूमिपुत्रांचे दैवत लोकनेते स्व. दि. बा. पाटील

भूमिपुत्र, शेतकरी, कष्टकरी, प्रकल्पग्रस्तांचे दैवत दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचा आज स्मृतिदिन. जनतेसाठी या लोकनेत्याने आपले आयुष्य वेचले. विशेषकरून प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे...

लोकनेते दि. बा. पाटील यांचा जन्म १३ जानेवारी १९२६ रोजी उरण तालुक्यातील जासई येथे झाला. ते पनवेल पालिकेचे नगराध्यक्ष, महाराष्ट्राचे पनवेल-उरण विधानसभा मतदारसंघाचे चार वेळा आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार होते. सिडको त्या वेळी नवी मुंबईची बांधणी करीत होती. त्या काळात दि. बा. पाटील यांनी नवी मुंबई सिडको आणि जेएनपीटी प्रकल्पग्रस्त जनतेचे खंबीर नेतृत्व केले. पोलिसांचा लाठीमार सहन केला तसेच कारावासही पत्करला. साधी राहणी, उच्च विचारसरणी असणाऱ्या या नेत्याच्या एका हाकेला हजारो, लाखोंच्या संख्येने ओ देणारे कार्यकर्ते होते.

आज सिडकोने नवी मुंबई पूर्णपणे व्यापली आहे. याच नवी मुंबईसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जात असताना त्या दहा-वीस हजार रुपये एकरी भावाने घेतल्या जाणार होत्या. महाराष्ट्रात स्वातंत्र्याच्या चळवळीत जे जोरदार लढे झाले त्या लढ्यांसारखाच सिडकोविरोधातला शेतकऱ्यांच्या हिताचा लढा 'दिबा' यांनी लढवला. जासई येथील लढाईत पाच शेतकरी मारले गेले, शंभर जखमी झाले. पोलिसांच्या गोळीबाराचा सामना करून शेतकऱ्यांनी ही लढाई जिंकली आणि सरकारकडून सिडको परिसरातील जमिनीचा जास्तीत जास्त भाव मिळवला. २०१२ साली अखेरचा लढा देत जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांच्या साडेबारा टक्के भूखंडाची मागणी सरकारकडून मान्य करून घेतली. रायगड आणि नवी मुंबईतील भूमिपूत्र असलेल्या जनतेबरोबर 'दिबां'चे जिव्हाळ्याचे संबंध होते. ते शेवटपर्यंत कष्टकऱ्यांसाठी लढले.



१६ आणि १७ जानेवारी १९८४ साली 'दिबां'च्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. याच दिवशी सध्या जेएनपीटी बंदरासाठी विस्थापित करण्यात आलेल्या नवीन शेवा गावात पोलिसांनी शेतकऱ्यांवर पहिला गोळीबार केला होता. त्यानंतर पेटलेल्या या आंदोलनाने उग्र रूप धारण केल्याने १६ जानेवारी रोजी दास्तान फाटा येथे झालेल्या आंदोलनात दोन शेतकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले, तर दुसऱ्या दिवशी १७ जानेवारी रोजी नवघर फाटा येथे झालेल्या गोळीबारात तीन शेतकऱ्यांनी आपले आत्मबलिदान केले होते.

लोकनेते दि. बा. पाटील यांची विधिमंडळातील अभ्यासपूर्ण भाषणे गाजली. 'दिबा' उभे राहिले म्हणजे सत्ताधारी पक्षांच्या गोटात शांतता पसरत असे. करारी आवाज आणि मुद्देसूद बोलणे हे त्यांच्या विरोधकांमध्ये त्या वेळी आदरयुक्त घबराहट पसरवत असते. त्यांचा अभ्यास व दराराच तेवढा होता.

२४ जून २०१३ रोजी 'दिबां'चे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. पनवेल येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मोठा जनसमुदाय लोटला होता.

सध्या पनवेल तालुक्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे राहत आहे. या विमानतळाला भूमिपुत्रांचे कैवारी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे यासाठी न भुतो न भविष्यति असा लढा देण्यात आला. लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून लढल्या गेलेल्या या लढ्याला अखेर यश आले आणि राज्य शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्याचे घोषित केले. आता हा विषय केंद्र शासनाकडे गेला असून तेथे याबाबतची प्रक्रिया पूर्ण होऊन औपचारिक घोषणा बाकी आहे. ती येत्या काळात होणे अपेक्षा आहे. ही म्हणजे प्रकल्पग्रस्तांनी 'दिबां'ना वाहिलेली खरी श्रद्धांजली म्हटली पाहिजे.

# लांबलेल्या पावसाचे पक्ष्यांनाही संकेत

चराचराला पावसाचे वेध लागले आहेत, कारण पावसाळा सृष्टीत नवजीवन नवचैतन्य घेऊन येत असतो, मात्र मानवाच्या पर्यावरणामधील हस्तक्षेपामुळे गेल्या काही वर्षांमध्ये पावसाची सुरुवात ही अनियमित होत आहे. यंदा बिपरजॉय चक्रीवादळामुळे जून महिना अर्धा संपला तरीही पावसाचे आगमन झालेले नाही. उशिरा येणाऱ्या पावसाचे संकेत येथील पक्षांना मिळाल्याचे येथील काही पर्यावरण अभ्यासकांनी नमूद केले आहे. परिणामी जिल्ह्यात पक्षांनी आपली घरटे बांधण्यास काही प्रमाणात उशीर केला आहे, तर काही स्थलांतरित पक्षांचे देखील आगमन झालेले नाही.

निसर्ग अभ्यासक शिक्षक राम मुंडे यांनी या संदर्भात येथील जंगल व परिसरात निरीक्षण करून नोंदी घेतल्या आहेत. मुंडे यांनी सांगितले की, एप्रिल महिन्यामध्ये अवकाळी पाऊस ज्या वेळेस पडला त्या वेळी काही पक्षांनी आपली घरटी बनवायला सुरुवात केली होती. एप्रिल महिन्यानंतर जून महिना चालू झाला व जूनचा अर्धा महिना उलटला तरीदेखील जिल्ह्यात दमदार पावसाची सुरुवात झालेली नाही. त्यामुळे काही पक्षी



पावसाची वाट पाहत आहेत. वास्तविक पक्षी पाऊस येण्याच्या संकेत देतात. निसर्गामध्ये काही पक्ष्यांना समजते की पाऊस उशिरा येतो. यानुसार मुंडे यांनी निरीक्षण केलेले पक्षी व या पक्षांचे संकेत मांडले. व्हाईट थ्रोटेड किंगफिशर पांढऱ्या छातीचा धीवर या पक्षाच्या बाबतीत एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धामध्ये मुंडे हे पाटणूस येथे शाळेमध्ये जात असताना रस्त्याच्या बाजूला त्यांना पांढऱ्या छातीचा धीवर पक्षी जोडीने घरटे बनवताना दिसले होते, मात्र त्यानंतर आता जूनमध्ये त्या ठिकाणी पाहिले असता ते पक्षी मुंडे यांना दिसून आले नाहीत. त्यांचे घरटे बनविणे (नेस्टिंग) तिथेच थांबले आहे.



पाऊस लांबल्याने ओरिएंटल ड्रॉप किंगफिशर म्हणजेच तिबोटी खंड्याचे अद्यापही कोकण व जिल्ह्यामध्ये आगमन झालेले दिसत नाही. तिबोटी खंड्या बरोबर जूनच्या सुरुवातीला १२ तारखेपर्यंत विळे-भागाड या परिसरामध्ये दिसतो. जूनपर्यंत तो येथे दाखल होतो, मात्र तो अजून आलेला नाही. जांभळी लिटकुरी हा पक्षी करवंदाच्या जाळीला किंवा छोट्या-मोठ्या वेलींना घरट बनवतो, पण त्यांनीही अजून घरटे तयार केलेले नाही. तर नारंगी कस्तुर याची रेलचेल जास्त दिसत नाही आहे. त्याचे घरटे बांधण्याची लगबग किंवा घरटे बांधलेले ही कुठे दिसत नाही आहे. त्यामुळे या सर्व हालचाली आणि निरीक्षणावरून निसर्गामध्ये एवढा बदल होत असल्याचे दिसत आहे. **-धम्मशील सावंत**



## बदलते तंत्रज्ञान

# वायरलेस चार्जरने कसा चार्ज होतो तुमचा फोन? जाणून घ्या



आजच्या काळात तुम्ही पाहिले असेल की लोक फोन चार्जिंग करण्यासाठी वायरलेस चार्जर वापरतात. या चार्जरने फोन चार्ज करण्यासाठी कोणतीही वायर वापरली जात नाही. यामध्ये विशेष प्रकारची एक प्लेट असते ज्यावर फोन ठेवला की आपोआप चार्ज होऊ लागतो. त्यासाठी कोणत्याही प्रकारे फोनला वायर कनेक्ट करण्याची आवश्यकता नाही, पण कधी तुम्ही विचार केला आहे की ही प्लेट कशी काम करते आणि अशी काय सिस्टीम असते की ज्यावर फोन ठेवताच चार्जिंग सुरू होते? चला जाणून घेऊया...

आज काल स्मार्टफोनचे टाइप ए, टाईप बी किंवा टाईप सी असे चार प्रकारचे चार्जर आहे जे फोनला कनेक्ट करून चार्जिंग केले जाते. पण वायरलेस चार्जरची सिस्टीम थोडी वेगळी आहे. यासाठी एक डिव्हाइस वापरले जाते ज्याला इलेक्ट्रोमॅक्नेटीक इंडक्शन म्हटले जाते. हे डिव्हाइस हवेत इलेक्ट्रिक एनर्जी रिलीज करते आणि त्यामुळे त्याच्या चारी बाजूने मॅग्नेटीक फिल्ड तयार होते. ज्यामध्ये फोन ठेवताच त्यात असलेली कॉपर काईल या फिल्डमधून एनर्जी खेचून घेते आणि बॅटरीपर्यंत पाठवते. त्यामुळे फोनची बॅटरी चार्ज होऊ लागते.

अशामध्ये फोन चार्ज करण्यासाठी कोणतेही वायर किंवा पीनची आवश्यकता नसते. तुम्ही कोणताही जॅक न वापता फोन चार्ज करू शकता. पण, हे डिव्हाइस नॉर्मल चार्जरप्रमाणे वीजेशी कनेक्टेड असते आणि अशामध्ये वायरलेस चार्जिंगसाठी एक वायरची गरज असते आणि फक्त

वायरलेस चार्जिंग कित्येक गोष्टीत सोयीस्कर वाटत असले तरीही काही रिपोर्ट्समध्ये एक्सपर्टने सांगितले आहे की, फोन चार्ज करण्याची ही योग्य पद्धत नाही. यामुळे फोन लवकर गरम होतो आणि कित्येक फोन जास्त हीट सहन करू शकत नाही आणि लवकर खराब होऊ शकतात. त्यामुळे फोन जास्त हायलेट नसेल तर त्यासाठी हा चार्जर जास्त चांगली कामगिरी करू शकत नाही असे मानले जाते. तसेच जेव्हा वायरलेस चार्जिंग केली जाते तेव्हा फोन पुन्हा पुन्हा चार्जिंगबरोबर डिसकनेक्ट होतो तेव्हा जो फोनसाठी चांगले मानले जात नाही.

# क्रांतिकारक दामोदर हरी चापेकर

चापेकर बंधू हे क्रांतिकारी होते. त्यांची नावे दामोदर (जन्म २४ जून १८६९), बाळकृष्ण (जन्म १८७३) आणि वासुदेव (जन्म १८८०) अशी होती. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे ब्रिटीश प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करण्यात या क्रांतिकारकांचा सहभाग होता. पुण्यातील जनता ही नियुक्त केलेल्या अधिकारी आणि सैनिकांच्या अत्याचारांनी त्रस्त होती.



## निमित्त

पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरित होऊन हे भाऊ क्रांतिकारक चळवळीकडे वळले. ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध टिळकांनी 'केसरी'मधून घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली होती. या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडने रोग निवारण करण्याच्या उपायांची सक्तीने अंमलबजावणी सुरू केली. हे करताना त्याने सामाजिक पायदंड पायदळी तुडवले. जसे की लोकांची घरे उपसून जाळणे, देवघरात जाऊन देवांचा अपमान करणे, तपासणीच्या नावाखाली महिलांशी अभद्र वर्तन करणे, कर्त्या पुरुषांना नामर्दाप्रमाणे हीन वागवणे.

रँडच्या या अत्याचाराविरुद्ध लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी व मराठा वृत्तपत्रांमधून टीकेची झोड उठविली. आपल्या मराठा वृत्तपत्रात लिहिताना टिळक म्हणाले, 'आजकाल शहरात पसरलेला प्लेग त्याच्या मानवी रूपापेक्षा अधिक दयाळू आहे. रँडशाहीच्या या जुलमी कृत्यांचा दामोदरपंत चाफेकरांना राग आला. रँडला संपविल्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे त्यांनी ठरविले. रँडचा साथीदार आयहर्स्ट हा सुद्धा त्याच्यासारखाच जुलमी होता. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या साऱ्यांचा सूड घेण्याची योजना त्यांनी तयार केली. वॉल्टर चार्ल्स रँडच्या पुण्यातील लोकांना दिलेल्या वाईट वागणुकीबद्दल या भावांनी त्याच्या वधाचा कट रचला. त्या वेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती तसेच मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. दामोदर चापेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत २२ जून १८९७ रोजी मध्यरात्री निवासस्थानातून बाहेर पडलेल्या रँडवर जवळून गोळ्या झाडल्या. रँड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने ३ जुलै १८९७ रोजी मरण पावला. याचवेळेस दामोदराच्या भाऊ बाळकृष्णाने रँडसोबत बसलेल्या लेफ्टनंट आयरिस्टवर गोळ्या झाडल्या. त्यामुळे ब्रिटीश सरकार हादरून गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभि द्रविड बंधूनी (रामचंद्र व गणेश शंकर द्रविड) या कटाची बातमी केवळ आर्थिक लाभपोटी सरकारला दिली. नंतर वासुदेव चापेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंना ठार केले. तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदरला मुंबईत अटक झाली व १८ एप्रिल १८९८ रोजी त्यास येरवडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला ८ मे १८९९ व बाळकृष्णाला १६ मे १८९९ रोजी फासावर चढवण्यात आले. अशा प्रकारे तीनही चापेकर बंधू शहीद झाले. चापेकरांचे वडील हरिपंत हे तिघा मुलांच्या अशा मृत्यूच्या धक्क्याने १९०० साली मरण पावले. या क्रांतिकारकांच्या कार्याने पुणे शहर ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या असंतोषाचे प्रमुख केंद्र बनले.

## क्लिक...क्लिक...!

(छाया : राधाकृष्ण म्हापसेकर)



सिंधुदुर्ग : पावसाळा सुरू झाला की आठवडा बाजारातून लोक झाडांची कलमे, रोपे लागवडीसाठी घेऊन जातात.

## आरोग्य प्रहर

# ड्रायफ्रुट्स खाण्याची योग्य वेळ कोणती?



ड्रायफ्रुट्स खाणे हे शरीरासाठी उत्तम असते. काही लोकांना ते सकाळी तर काहींना ते रात्री खाण्याची सवय असते, पण रात्रीच्या वेळेस ड्रायफ्रुट्स खाणे सुरक्षित असते का? त्याने कोणता फायदा किंवा नुकसान होते ते जाणून घेऊया.

रात्री ड्रायफ्रुट्स खाणं हेल्दी असते का? कोणती वेळ उत्तम? तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार रात्रीच्या वेळी ड्रायफ्रूट्स खाणे हे बिलकूल हेल्दी नसते.

### ड्रायफ्रुटस खाण्याची योग्य वेळ कोणती?

ड्रायफ्रुटस ही रात्रभर पाण्यात भिजवून मग खाणे हे अधिक फायदेशीर मानले जाते. ड्रायफ्रुटसचे सेवन अनेक प्रकारे करता येते. आपण ते नुसतेही खाऊ शकतो. तसेच स्मूदी किंवा शेकमध्ये घालूनही त्याचे सेवन करता येते. ड्रायफ्रुटसमध्ये हेल्दी फॅट्सचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे सकाळच्या वेळी ते खाणे हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. अन्यथा नाश्त्यानंतर किंवा संध्याकाळच्या स्नॅक्समध्ये ड्रायफ्रुटस खाणे हे अतिशय आरोग्यदायी ठरते.

### रात्री ड्रायफ्रुट्स खाण्याचे तोटे

ड्रायफ्रुट्स हे उष्ण प्रभावाचे असतात. त्यामुळे रात्री जास्त ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने शरीरात उष्णता निर्माण होते. हे शरीराचे तापमान वाढवू शकते आणि त्यामुळे आपल्याला अस्वस्थ वाटू शकते.

### वजन वाढू शकते

ड्रायफ्रुट्समध्ये सर्व पोषक तत्वं तर असतातच, पण त्यात कॅलरीही अधिक असतात. त्यामुळे रात्री ड्रायफ्रुट्स खाणे हे आपले वजन वाढण्यासाठी कारणीभूत ठरू शकते. जे लोकं वजन कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत त्यांच्यासाठी रात्री ड्रायफ्रुट्स खाणे जास्त हानिकारक ठरू शकते.

### पोटाच्या समस्या

रात्रीच्या वेळी ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. यामुळे पोटात उष्णता निर्माण होऊ शकते. त्यांच्या अतिसेवनाने पोटदुखी, बद्धकोष्ठता आणि अपचन यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

(अधिक माहितीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा)

निवडक

## मांडला शाळेचे 'नवोदय' परीक्षेत यश



**रेवदंडा** : येथील राजिप मांडला मराठी शाळेतील दोन विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड झाली. मांडला मराठी शाळेतील सार्थक संजय बंदरी आणि प्रचिती मिलिंद पालवणकर या दोन्ही विद्यार्थ्यांनी सदर केंद्रीय नवोदय विद्यालयाच्या स्पर्धा परीक्षेचे सर्व निकष पूर्ण करून घवघवीत यश संपादन केले. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, माजी गटशिक्षणाधिकारी बी. के. पाखरे, केंद्रप्रमुख मोहिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मांडला मराठी शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षेची यशस्वी तयारी करून घेतली. शिष्यवृत्ती परीक्षेतही सार्थक संजय बंदरी आणि आयुष अभिजित लाड हे विद्यार्थी पात्र ठरले. या दोन्ही स्पर्धा परीक्षेत गुणवान ठरलेल्या विद्यार्थ्यांचे केंद्रप्रमुख मोहिनी पाटील, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सुरेश नांदगावकर, मुख्याध्यापिका समीक्षा नांदगावकर, साधनव्यक्ती महेश भगत, विश्वनाथ म्हात्रे, सुनील काळे, संतोष पुकळे, चेतन पाटील यांनी अभिनंदन केले.

## चौकमध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**चौक** : ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या वतीने इ. दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायत सभागृहात सरपंच रितु ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला. परीक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करणे गरजेचे आहे, असे सरपंच रितु ठोंबरे यांनी सांगितले. अशा कौतुकाने आम्हास नवीन ऊर्जा प्राप्त झाल्याचे विद्यार्थी वेदांत अंबावणे यांनी सांगितले.

## साळाव शाळेत योग दिन उत्साहात



**रेवदंडा** : आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून राजिप साळाव मराठी शाळेत मोठ्या उत्साहात योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी योगाचे विविध प्रकार घेण्यात आले. निरोगी शरीर तसेच स्वस्थ मनासाठी योग आवश्यक आहे दररोज योग केल्याने शरीराला ऊर्जा तसेच मनाला शांती मिळते, असे मार्गदर्शन मुख्याध्यापक चंद्रकांत रघुनाथ काटकर यांनी केले. या वेळी अपेक्षा म्हात्रे, रेश्मा धुमाळ, प्रिती झेंडेकर उपस्थित होत्या. त्यांनीही विद्यार्थ्यांसमवेत योगासने केली.

# शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे; पावसाची प्रतीक्षा

## रोह्यामध्ये भात, नागली, वरी, तूरसह भाजीपाला लागवडीचे नियोजन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुका भातशेतीसाठी प्रसिद्ध होता. या वर्षी खरीप हंगामात भातशेतीबरोबर नागली, वरी, तूर, भाजीपाला आदींची लागवडही होणार असून त्यासाठी शेतकरी खरीप पूर्व मशागतीचे काम करताना दिसत आहे, परंतु पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे.

तालुक्यात पूर्वी भातशेतीचे क्षेत्र १०८०० हेक्टर होते, परंतु दिवसेंदिवस भातशेतीचे क्षेत्र कमी होताना दिसत आहे. आता ९,८५० हेक्टर भातशेतीचे क्षेत्र लागवडीखाली येत आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार सोमवारपर्यंत ३८८.७५ क्षेत्रावर धूळवाफ पेरणी झालेली आहे. पावसाळ्याच्या प्रतीक्षेत असलेल्या



शेतकरी मात्र हवालदिल दिला आहे.

तालुक्यात भातलावणी यांत्रिकी पद्धतीने १०० हेक्टरवर नियोजित केले आहे. यांसह पट्टा पद्धतीने, एसआरटी पद्धतीने, चारसूत्री पद्धतीने भात लागवड करण्यात येणार आहे.

### विविध योजनांची अंमलबजावणी

*एकीकडे खरीप हंगामाची तयारी चालू असताना दुसरीकडे कृषी विभागाकडून वैयक्तिक शेततळे, सामूहिक शेततळे, मागेल त्याला काजू योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना राबविण्याचे काम चालू आहे. यांसह सेंद्रीय शेतीसाठी कृषी विभाग पुढाकार घेत असून खत तयार करणे प्रात्यक्षिके घेत काही ठिकाणी ड्रम्स देण्यात आले आहेत, अशी माहिती रोहा मंडळ कृषी अधिकारी अमोल सुतार यांनी दिली आहे.*

भातशेतीबरोबरच २६९ हेक्टरवर नागली पिकासाठी खरीप पूर्व मशागतीचे काम चालू आहे. नागली पीक हे पूर्वी २००० वर घेतले जात होते. २५९ हेक्टरवर तूर पिक घेतले जाते. सध्या या पिकाच्या खरीप पूर्व मशागतीचे काम चालू आहे. गेल्या दहा वर्षांत रोहा तालुक्यात भाजीपाला मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. यामध्ये प्रामुख्याने कारली, दोडकी, मिरची यांसह अन्य भाजीपाला पीक आज घेतले जात आहे. सध्या खरीप हंगामात १०६.८० हेक्टरवर खरीप पूर्व मशागतीचे काम चालू आहे.

शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून ४२५० भाजीपाला बियाण्याचे मिनीकिट देण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने मिरची, चवळी, दोडका, काकडी, भेंडी, भोपळा इत्यादी बियाण्यांचा समावेश आहे.

# सुधागड पेडली येथे भाविकांच्या जीपला अपघात

### तीन जण गंभीर जखमी

**पाली : प्रतिनिधी**

कसारा येथून अष्टविनायक पाली बल्लाळेश्वर दर्शनासाठी जाणारी जीप पेडली द्वारका हॉटेलनजीक उलटून शुक्रवारी (दि. २३) अपघात झाला. या जीपमधून एकूण १० प्रवासी होते. त्यापैकी तिघे प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

पाली-खोपोली राज्यमहामार्गावरून अष्टविनायक बल्लाळेश्वर दर्शनासाठी



जात असताना पाऊस पडत असल्याने चालकाचे वाहनावरचे नियंत्रण सुटले व जीप रस्त्याच्या खाली उलटली. या अपघातात तिघेजण जखमी झाले आहेत. या प्रवाशांमध्ये संजय आरे (२३), भारती आरे (१९), सुनील वारे (१९), योगेश धापटे (२०), सागर झुगरे (२१), ऐश्वर्या झुगरे (१९), प्रकाश घाटल (२५), प्रियंका घाटल (२२), विशाल अवाटे (२२) आणि सौ. अवाटे (२०) या प्रवाशांचा समावेश आहे. जखमींना परळी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीला सामाजिक संस्थेचे गुरुनाथ साठीलकर, विजय भोसले, शाहिद शेख, अमोल कदम, भक्ती साठेलकर, पूजा साठेलकर, विशाल चव्हाण, विवेक रावळ, धर्मा पाटील, निलेश कुदळे, अनिल सावंत, शैलेश मांडवकर यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराटे यांच्या सहकाऱ्यांनी मदतकार्य केले.


## नमुना एन. डी.

**(नियम ९२ (३) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. 360/ PNL/2003 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 BF 9656 चे मालक नामदेव शंकर पाटील यांचे दि. २५/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी, श्रीमती निशीगंधा नामदेव पाटील, पत्ता : घर नं. २३८ पनवेल मोरबे रोड शंकर मंदिराजवळ खानाव,पो. मोरबे, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव :** श्रीमती निशीगंधा नामदेव पाटील

पत्ता : घर नं. २३८ पनवेल मोरबे रोड शंकर मंदिराजवळ खानाव,पो. मोरबे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६


# खालापूर शहरात दूषित पाणीपुरवठा

## नागरिकांच्या आरोग्याशी नगरपंचायतीचा खेळ

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

दुर्गंधी आणि दूषित पाणी येत असल्याने चार वर्ष असून बंद असलेल्या पाताळगंगा नदीवरील पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करण्यात आली, मात्र यामुळे शहरातील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत आहे. विशेष म्हणजे पातळगंगा नदीतून पाणीपुरवठा सुरू झाल्याची माहिती नागरिकांना जनजागृती करून देण्यात आलेली नाही.

पिण्याच्या पाण्याची समस्या खालापूर नागरिकांच्या पाचवीला पुजलेली आहे. तालुक्याचे ठिकाण असून देखील कित्येक वर्ष खालापूर नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी नाही. खालापूर शहरासाठी कलोते धरणालगत पाझर विहीर करून पाणीयोजना आहे, परंतु पाच ते सहा किमीहून जलवाहिनी येत असून नेहमी कुठे गळती तर पंपात बिघाड ठरलेला असतो. सध्या कलोते धरणाने तळ गाठल्याने खालापूरची पेयजल योजना बंद आहे. त्यामुळे शहरासाठी पर्यायी पाणीपुरवठा म्हणून सावरोली पुलाजवळ पाताळगंगा नदीलगत पाझर विहिरीतून पाणी उचलले जात आहे. ही योजना २० डिसेंबर २०१९ला कार्यान्वित करण्यात आली होती, परंतु अतिशय दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने पेयजल योजना बंद पडली होती.

ज्या ठिकाणी विहिरीतून पाणी उचलले जाते तिथे वाहत येणारे पातळगंगा नदीचे पाणी अतिशय दूषित आहे. काही अंतरावर महड येथे असणारे मुंगुर माशांचे तलावातील घाणेरडे पाणी पातळगंगा नदीत सोडण्यात येत असल्याने जलप्रवाह दूषित होत आहे.

शिवाय नदीकिनारी टाकण्यात येत असणारी पोल्ट्रीतील घाण पाण्याबरोबर वाहत येत असून जलस्त्रोत प्रदूषित होते. या दूषित पाणीपुरवठ्याबाबत खालापूर शहरातील नागरिकांना कल्पना नसल्याने अनेक कुटुंब पिण्यासाठी पाणी वापरत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.

### दैनंदिन कामासाठी पाणी वापरावे!

*नगरपंचायतीमध्ये जाऊन याबाबत चौकशी केली असता नगर अभियंता देवेंद्र मोरखंडीकर यांनी सध्या पाणीटंचाईमुळे पाताळगंगा नदीतील पाणी वापरले जात असल्याचे कबूल केले. नागरिकांनी हे पिण्यासाठी न वापरता दैनंदिन कामासाठी पाणी वापरावे, अशी माहिती दिल्याचे सांगितले, परंतु नागरिकांपर्यंत ठोस माहिती नसल्याने नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहे. काही कर्मचारीही असे दुर्गंधीयुक्त पाणी सोडण्यास नाखूष आहेत.*

# बालसुधारगृहातून मुलाचे पलायन

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील बालसुधारगृहात राहून जवळच्या शाळेत शिक्षण घेणारा एक १३ वर्षीय मुलगा बाथरूमला जातो, असे सांगून शाळेतून बाहेर पडला आणि पुन्हा शाळेत आलाच नाही. याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत दहिवलीतर्फे निड येथे अपहृत बालक जिल्हा परिविक्षा आणि संघटना संचलीत मुलांचे बालगृह असून एका गुन्ह्यातील आरोपी असलेला १३ वर्षीय मुलगा दहिवली येथील शाळेत आपल्या सहकारी विद्यार्थ्यांसह गेला होता. शाळेमध्ये असताना दुपारी १२.२५ वा. चे सुमारास बाथरूमला जाऊन येतो असे सांगून तो बाथरूमला गेला. त्यानंतर दोन तास झाले तरी तो वर्गात परत आला नाही. अखेर शिक्षकांनी याबाबत पोलिसांत कळविले. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक **खुशाल जुहारमल ओसवाल** या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर बिनशेती जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**बिनशेती जमीनीचे वर्णन**

**मौजे :- किरवली, तालुका- कर्जत, जिल्हा -रायगड.**

| गावाचे नाव | भुमापन नं/ उपविभाग. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| किरवली | ६३/१ मध्ये प्लॉट नं.२ | ३५५ चौमी | ३५.५० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमान लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पनवेल
दिनांक - २३/०६/२०२३

**सही/-**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता : डी -३/१, किनारा हौ. सो., बावन बंगला, ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**
**मो.नं. ९८२०७९५६०५**


# माणगाव नगरपंचायतीतर्फे स्वच्छता अभियान



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहर स्वच्छ व सुंदर दिसावे याकरिता नगरपंचायतीतर्फे शुक्रवारी (दि. २३) शहरातील महत्त्वाचा समजला जाणारा हमरस्ता म्हणजे कचेरी रोड कॉर्नर ते वाकडाई देवी मंदिर या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

या स्वछता अभियानात एकूण ५७८ विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. शहरातील वनपरिक्षेत्र अधिकारी, अंगणवाडी सेविका, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय, तहसीलदार कार्याल, कृषी अधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभागीय अधिकारी कार्यालय, शाळांमध्ये टिकम भाई मेथा कॉमर्स कॉलेज, द. ग. तटकरे कॉलेज (राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक) व विद्यार्थी, श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल (स्काऊट गाईड) व विद्यार्थी, नूतन माध्यमिक विद्यामंदिर, एस. एस. निकम इंग्लिश स्कूल, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान बैठक समिती श्री सदस्य, अशोकदादा साबळे विद्यालय विद्यार्थी, सेवाभावी संस्था, डॉक्टर आणि पंचायत कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

या स्वच्छता अभियाना वेळी कचेरी रोडवरील काही बेजबाबदार नागरिकांकडून इशरत प्लाझा आणि नाझ प्लाझा रेल्वे ब्रिज शेजारी वारंवार सूचना करून देखील कचरा टाकण्यात येतो त्या ठिकाणी नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार यांनी पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत त्या जागेला पुष्पहार अर्पण करून अगरबत्ती लावून नागरिकांनी या ठिकाणी कचरा टाकू नये, अशी विनंती केली आहे. या संपूर्ण कार्यक्रमावेळी माणगाव तहसीलदार विकास गारुडकर, माणगांव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, विरोधी पक्षनेते आनंद यादव, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक सचिन बोंबले, दिनेश रात्वडकर, रत्नाकर उभारे, रवींद्र भिकु मोरे, प्रा. हर्षल जोशी, श्रद्धा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या संस्थापिका बिजाक्षी राय व विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. गुरुवारी (दि. २२) जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२८ चालकांवर कायदेशीर कारवाई करून एक लाख ९८ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.


## पनवेल महानगरपालिका
### ता.पनवेल, जि. रायगड

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

**जाहिर सुचना**

घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन नियम २०१६ तसेच स्वच्छ भारत अभियान यामधील मार्गदर्शक सुचनांनुसार शहरी भागातील सर्व हॉटेल्स, मोठ्या संस्था, मोठ्या प्रमाणावर (१०० किलो पेक्षा जास्त) कचरा निर्माण करणा-या सोसायटी यांनी निर्माण केलेल्या घनकच-यावर स्वतः प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉटेल्स, मोठ्या संस्था, मोठ्या प्रमाणावर (१०० किलो पेक्षा जास्त) कचरा निर्माण करणा-या सोसायटी यांना सुचित करण्यात येते की, आपण निर्माण केलेल्या घनकच-यावर स्वतः प्रक्रिया करावी. तसेच स्वतः कच-यावर प्रक्रिया करणे शक्य नसल्यास पनवेल महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या कंत्राटदासोबत करार करून कच-याची विल्हेवाट लावण्याकरिता सदर कचरा कंत्राटदारास हस्तांतरीत करावा. पनवेल महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या कंत्राटदाराची माहिती खालील प्रमाणे.

| अ | कंत्राटदाराचे नाव | महत्तम मंजुर दर | |
|---|---|---|---|
| | | निवासी ( प्रति फ्लॅट प्रति महिना | अनिवासी ( प्रति किलो) |
| १ | LAHS green india pvt ltd, | रू.150 (With GST) | रू.9.50 (With GST ) |

जा. क्र/पमपा/घकवि/२५२३/५६१/२०२३
दिनांक २३/०६/२०२३

सही/-
उप आयुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका



## उरण नगरपरिषद
### निविदा सूचना

जा.क्र. उतर आरोग्य/ ८०५/२०२३-२४
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक: २४/०६/२०२३

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉम फि |
|---|---|---|---|
| | उरण नगरपरिषद हद्दीतील मोरा स्मशान भूमी येथे मृतदेह जळीत करणेकामी शेगड्या पुरविणे तसेच पुरविलेल्या शेगड्यांचे विटांमध्ये बांधकाम करणे. | २०००/- | १०००/- |

**अटी/शती :-** उरण नगरपरिषद हद्दीतील मोरा स्मशान भूमी येथे मानवी मृतदेह जळीत करणेकामी शेगडया पुरविणे तसेच पुरविलेल्या शेगड्यांचे विटांमध्ये बांधकाम करणेकामी सन २०२३ -२४ या वर्षाकरीता वार्षिक ठेकेदार नियुक्त करणेकामी अनुभवी तथा नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोर बंद निवीदा मागवीत आहे. निवीदा दिनांक २३/०६/२०२३ पोसूने दिनांक ०७/०७/२०२३ पर्यंत सायं ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांच्या नावे दाखल करणेचे आहे.

**१. इसारा रक्कम :-** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष रोखीने नगरपरिषद लेखा विभागात दिनांक ०६/०७/२३रोजी सायं. ४:०० वाजे पर्यंत भरणेचे आहे. ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निवीदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**२. कोरे निवीदा नमुने :-** को-या निवीदाचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निवीदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक ०६/०७/२३ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामध्ये उपलब्ध होतील. निवीदा नमुने कोणत्याही परिस्थीतील पोस्टाने पाठविली जाणार नाहीत. सदर कामाच्या अटी / शर्ती आणि सविस्तर निवीदा सूचना आरोग्य विभागामधून उपलब्ध होणार असून इच्छुक ठेकेदारांनी आरोग्य विभाग प्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

**सही/-**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

## निवडक

### चेंबरभोवतीचा खड्डा बुजवण्याची मागणी

**नवी मुंबई** : दिघा प्रभाग क्र. १ मुकुंद कंपनीपासून ते ईश्वर नगर आगिवले हाईटस् येथील पदपथावर असलेल्या



चेंबरच्या शेजारी मोठा खड्डा पडला आहे. त्यामुळे नागरिकांना चालताना त्रास होऊन अडथळे येऊन दुखापती देखील झाल्या आहेत. पावसाळा तोंडावर आलेला आहे. पावसाळ्यात या ठिकाणी पाणी साठून हे खड्डे दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा खड्डा तातडीने बुजवावा, अशी मागणी पालिकेकडे करण्यात आली आहे.

### ऐरोलीत शाहू महाराजांवर व्याख्यान

**नवी मुंबई** : पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची नाममुद्रा उमटविणारे राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शनिवारी (दि. २४) सायंकाळी ६.३० वा. राजर्षि छत्रपती शाहू मालिकेत छत्रपती शाहू महाराजांची भूमिका साकारणारे अभिनेते व व्याख्याते राहूल सोलापूरकर हे राजर्षि शाहू विचार वारसा या विषयावर व्याख्यानातून शाहू महाराजांचा जीवनपट व विचार मांडणार आहेत. या व्याख्यानाला नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### श्री विरुपाक्ष मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**पनवेल** : श्री विरुपाक्ष महादेव मंदिर ट्रस्टतर्फे यंदा श्रावण अधिक महिन्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. १८ जुलै ते १६ ऑगस्टदरम्यान रोज सकाळी महाविष्णूपूजन, संध्याकाळी सात ते आठ उपासना आणि रात्री नऊ वाजता कीर्तन असे कार्यक्रम करण्यात येणार आहे, तसेच १७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर निज श्रावण महिन्यात श्रावणी सोमवार निमित्त फुलांची आरास, विद्युत रोषणाई व प्रसाद अशा सेवा आयोजित करण्यात आले आहेत. ज्या भाविकांना महाविष्णूपूजन करावयाचे असेल त्यांनी लवकरात लवकर संपर्क साधून आपले नाव नोंदवावे, तसेच महिनाभर रात्री होणाऱ्या कीर्तनासाठी कोणाला प्रायोजक म्हणून देणगी द्यायची असेल त्यांनी त्याचप्रमाणे सेवेत सहभागी होण्यासाठी गुरुनाथ लोंढे (मो. ९३२०७७२८९३९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पुरेशा पाणीपुरवठ्यासाठी सिडकोचे नियोजन

## हेटवणे धरणात दीड महिने पुरेल एवढाच साठा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लांबणीलेल्या पावसामुळे नवी मुंबई महापालिकेपाठोपाठ सिडकोही पाणीकपातीचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. सिडको वसाहतींना पाणीपुरवठा करणाऱ्या हेटवणे धरणात केवळ दीड महिना पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे, तर नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणात ३५ दिवसांचा पाणीसाठा शिल्लक असल्याने कपातीच्या दृष्टीने सिडकोचे नियोजन सुरू आहे.

पनवेल महापालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा, रोडपाली, नवीन पनवेल, खांदा कॉलनी या वसाहतींना सिडकोतर्फे पाणीपुरवठा केला जातो. याबरोबरच उलवे, बामणडोंगरी, वहाळ, द्रोणागिरी या सिडकोच्या वसाहतींनाही पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी सिडकोची आहे.







सिडकोच्या मालकीचे हेटवणे धरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई महापालिका आणि एमआयडीसीच्या जलस्रोतांमार्फत या नागरी वसाहतींना सिडकोतर्फे पाणीपुरवठा केला जातो.

दैनंदिन पाण्याची तहान भागवण्यासाठी सिडकोला दररोज ४५० एमएलडी पाण्याची गरज लागते.

त्यापैकी हेटवणे धरणातून आता १८० एमएलडीपेक्षा जास्त पाणी घेतले जाते, तर नवी मुंबईकडून ४५ एमएलडी, एमजेपीकडून प्रत्येकी दहा एमएलडी आणि उर्वरित पाणीसाठा एमआयडीसीमार्फत पूर्ण केला जात आहे, परंतु जून महिना संपत आला तरी पावसाला सुरुवात झाली नसल्यामुळे धरणातील पाण्याने तळ गाठला आहे. त्यामुळे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी धरणातील जलसाठ्याचे आणि इतर सरकारी यंत्रणांकडून होणाऱ्या पाणीकपातीचा आढावा घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

> सिडकोच्या जलस्रोतात सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अद्याप पाणीकपातीचा कोणताही निर्णय घेतलेला नाही, मात्र येत्या दिवसांत पाऊस पडला नाही, तर पाणीकपातीचा निर्णय सिडकोला घ्यावा लागेल.
>
> –कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको

## शिरवणेत भाजपचे संयुक्त मोर्चा संमेलन उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मोदी @ ९ अंतर्गत नवी मुंबई जिल्ह्यातर्फे राजेश राय यांनी संयुक्त मोर्चा संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून खासदार धनंजय महाडिक उपस्थित होते.

खासदार धनंजय महाडिक यांनी केंद्र शासनाच्या योजनांबाबत माहिती दिली. त्यासह देशाने या नऊ वर्षांत किती प्रगती केली. काँग्रेसच्या काळात किती घोटाळे झाले होते याबाबत माहिती दिली. युवकांनी महागाई लक्षात घेताना काँग्रेसच्या काळात हीच महागाई किती होती हेही लक्षात घ्यावे. भाजपच्या कार्यकत्यांनी या सर्व बाबी शेवटच्या स्तरापर्यंत जनतेपर्यंत पोहोचवाव्यात असे आवाहन खासदार महाडिक यांनी केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, सतिश निकम, निलेश म्हात्रे, डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, दत्ता घंघाळे व सर्व जिल्हा मोर्चा, प्रकोष्ट, आघाडी, सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहिले.

## गटारांवरील धोकादायक झाकणे तातडीने बदला –पांडुरंग आमले

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सानपाडा सेक्टर ३मधील पदपथावरील गटारांची धोकादायक झालेली झाकणे तातडीने बदलण्यासाठी निर्देश देण्याची लेखी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष व अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकरांकडे एका निवेदनातून केली आहे.

सानपाडा सेक्टर ३ परिसरात पदपथावर असलेली गटारावरील झाकणे धोकादायक स्थितीत आहेत. पादचाऱ्यांचा चालताना पाय जरी पडला तरी ती झाकणे तुटून पादचाऱ्यांना जखमा होण्याची भीती आहे.



दिवसाउजेडी पादचारी चालताना काळजी घेतात, पण रात्रीच्या वेळी अपघात होण्याची भीती आहे. सानपाडा सेक्टर ३ परिसरात प्लॉट नं.४, रॉयल स्नॅक्सशेजारी साईसंगत बिल्डींग, शॉप क्र. २८ या ठिकाणी महापालिका प्रशासनाने बसविलेली गटारावरील झाकणांची दूरवस्था झाली असून ती धोकादायक स्थितीत आहेत. पादचाऱ्यांचा पाय पडला तरी पादचारी त्या झाकणासह गटारात पडण्याची भीती आहे. आपण समस्येचे गांभीर्य पाहता सानपाडा सेक्टर ३ परिसरातील गटारांवरील सिमेंटच्या झाकणाविषयी पाणी अभियान राबवून धोकादायक अवस्थेतील झाकणे तातडीने बदलण्याचे संबंधितांना निर्देश द्यावेत.

पाऊस आता सुरू होईल. निसरड्या झालेल्या पदपथावरून साचलेल्या पाण्यातून ये–जा करताना झाकणावर पाय पडल्यास दुर्घटनेची दाट शक्यता आहे. त्यामुळे सानपाडा सेक्टर ३ मधील गटारावरील झाकणाबाबत पाहणी अभियान राबवून खराब झालेली, तुटलेली, धोकादायक अवस्थेत असलेली झाकणे तातडीने बदलण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

## पनवेल व कळंबोली येथून ३७ लाखांचा गुटखा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने पनवेल व कळंबोली येथे छापा टाकून गुटखा पुरवठा व विक्री करणारे रॅकेट उघड केले आहे. यामध्ये एकजण पोलिसांच्या हाती लागला असून, त्याच्याकडून ३७ लाखांचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे. इतर १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल परिसरात गुटखा पुरवठादार येणार असल्याची माहिती मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्याद्वारे अपर आयुक्त दीपक साकोरे, उपायुक्त अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक माणिक नलावडे यांनी उपनिरीक्षक संजय रेड्डी, किरण राऊत, राहुल वाघ, अनिल यादव व अजय कदम आदींचे पथकाने पनवेल येथून हरिश्चंद्र दास (वय ३०) याला ताब्यात घेतले होते.

त्याच्याकडे काही प्रमाणात गुटखा आढळला होता. त्यानंतर अधिक तपासात पथकाने कळंबोली येथील एका गोदामावर छापा टाकला असता, मोठ्या प्रमाणात गोण्यांमध्ये साठवून ठेवलेला गुटखा आढळून आला. त्यानुसार सुमारे ३७ लाख रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

## आंतरराष्ट्रीय योग आणि संगीत दिन उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडुंग येथील सेंट विल्फ्रेड ग्रुप ऑफ कॉलेज येथे योग दिन आणि संगीत दिन साजरा करण्यात आला. या वेळी योगगुरू संजय बारसाकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे विविध प्रकार करुन दाखविले.

सेंट विल्फ्रेड्स संस्थेचे प्राचार्य फार्मसी डॉ. दीनानाथ झाडे, सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉचे प्राचार्य मृत्युंजय पांडे, धर्मेंद्र दुबे, छत्रपती शिवाजी महाराज तंत्रज्ञान संस्थेचे प्राचार्य डॉ. सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. अनिरुद्ध ऋषी, सेंट विल्फ्रेड्स इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरचे तत्त्व डॉ. साजू चारियन, संगीत विभागाचे एचओडी डॅनियल, स्नेहलसेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटीचे सांस्कृतिक प्रमुख महेश जाधव आणि कॉलेजचे प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एलिफंटा बेटावर जेएनपीएद्वारे योगसाधना

**उरण : प्रतिनिधी**

जनेपप्रा बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली योग सागरमाला थीम अंतर्गत आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जनेपप्राने पुढाकार घेत एलिफंटा लेणी या जागतिक वारसा स्थळाच्या परिसरात अनोख्या योगा सत्राचे आयोजन केले ज्यामध्ये जनेपप्राचे कर्मचारी आणि इतर भागधारकांनी उत्साहाने योगासने केली.

आपल्या जीवनातील योगाचे महत्त्व स्पष्ट करताना जनेपप्रा अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, संतुलन, एकता आणि कल्याण या सद्गुणांना कायम प्रोत्साहन देणारी योगा ही प्राचीन साधना आहे.





या योगा साधनेमध्ये सहभागी होत त्या माध्यमातून आयुष्याचा आनंद शोधण्यासाठी आम्ही प्रत्येकाला प्रोत्साहित करत आहोत. जनेपप्रा येथे आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे आयोजन करताना आम्हाला आनंद होत आहे. स्टेकहोल्डर्स पीएसए आणि पोर्ट ऑफ अँटवर्प ब्रुग्स यांनीही आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उत्सवात भाग घेतला.

जनेपप्रा सपोर्ट स्टाफ, कें. औ. सु. दलाच्या जवानांनी त्यांच्या कुटुंबियांसह आणि जनेपप्रा टाउनशिपमधील शालेय विद्यार्थ्यांनी आपापल्या ठिकाणी योगासने केली. जनेपप्रा अध्यक्ष संजय सेठी, आयएएस, अध्यक्ष, जनेपप्रा आणि उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सर्व कर्मचाऱ्यांसमवेत योगासने केली.

## चोरीच्या दुचाकीचा पोलिसांकडून शोध

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी बनावट नंबरप्लेट लावलेल्या आणि अनधिकृतपणे पार्किंग केलेल्या दुचाकींचा शोध घेऊन गुन्हा दाखल झालेल्या पोलीस स्थानकाच्या ताब्यात दिले.

कळंबोली वाहतूक पोलिसांनी कामोठे परिसरात गस्त करीत असताना, सेक्टर ८ येथे दुचाकी (एमएच ४६ एके ९१२३) ही फुटपाथवर अनधिकृतरित्या पार्क केल्याने कळंबोली वाहतूक शाखा येथे टोविंगद्वारे आणले. हवालदार अतुल शिंदे यांनी वाहनांचे नंबरची खात्री केली असता, नंबरप्लेट बनावट असल्याचे दिसून आले. त्यामुळे वाहनाचा खरा नंबर काढून मूळ मालकास संपर्क केला असता त्यांनी ही दुचाकी चोरीस गेली असून त्याबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार दाखल केल्याचे कळविले. त्यानुसार आग्रीपाडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधून वाहन त्यांचे ताब्यात देण्यात आले.

## बोकड खरेदीसाठी मुस्लिमांचा मोठा उत्साह

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या ईद उल अर्थात बकरी ईदनिमित्त नवी मुंबईतील विविध शहरातील मंडईमध्ये बकऱ्यांच्या खरेदी–विक्रीसाठी मोठी गर्दी होत असल्याचे दिसत आहे.



नेहमीप्रमाणे मंडईत महाराष्ट्रासह कानपूर, राजस्थान, रायबरेली, दिल्ली, अलवार, काश्मीर भागातील अनेक जातीचे बकरे विक्रीसाठी दाखल झाली आहेत. यंदा इंधन दरवाढीमुळे बकऱ्यांच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली असून बकऱ्याचे दर १५ हजार रुपयांपासून एक लाखांपर्यंत ठेवण्यात आले आहेत. मंडईत बकऱ्यांच्या किमतीने उच्चांक गाठला असताना, दरवाढीचा कोणताही परिणाम विक्रीवर झाला नसल्याचे व्यापारी यांनी सांगितले.

नवी मुंबई शहराची ओळख सर्वधर्मीय समुहांना घेऊन अशी आहे. येत्या ३० जून रोजी बकरी ईद असून हा सण शांततेत साजरा करण्याचे आवाहन विविध राजकीय पक्ष पोलीस दक्षता समिती आणि स्थानिक पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडून दरवर्षी करण्यात येत असते.

मोहम्मद पैगंबर यांच्या पूर्वीपासून बकरी ईद सन साजरा करण्याची प्रथा आहे. धनसंपदा लाभलेले मुस्लिम धर्मीय अल्लासाठी बकरी खरेदी करून ती गोरगरीब याना दान करण्याची पूर्वापार प्रथा असून आजही तितक्याच धार्मिकतेने साजरे करीत आहेत.

## मान्सून लांबल्याने सीताफळाच्या हंगामालाही उशिराने सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

बाजारात जूनमध्ये सीताफळ दाखल होण्यास सुरुवात होते, तर जुलै आणि ऑगस्ट महिन्यात या फळाची आवक वाढण्यास सुरुवात होते, मात्र यंदा मान्सून लांबल्याने सीताफळाच्या हंगामाला उशिराने सुरुवात झाली आहे.

सीताफळ हे महाराष्ट्रातून पुणे व नगर जिल्ह्यांतून दाखल होत असून नोव्हेंबर महिन्यापर्यंत या फळाचा हंगाम सुरू असतो. १५ जूननंतर बाजारात सीताफळ दाखल होण्यास सुरुवात होते ते जुलै–ऑगस्टमध्ये आवक वाढते.



मात्र यंदा मान्सून लांबला असल्याने सीताफळाच्या हंगामाला ही १५– २० दिवस उशिराने सुरुवात होणार असून १५ जुलैनंतर बाजारात आवक वाढेल असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे. सीताफळाचा हंगाम चार महिने असतो. सीताफळ उत्पादक शेतकरी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात छाटणी करीत असतात. त्यानंतर साधारण एक महिन्याच्या कालावधीत पिकाला पाणी देण्यात येत नाही. त्यानंतर मात्र या पिकाला पाण्याची, पावसाची अधिक गरज भासते.

सीताफळ परिपक्व होण्यासाठी चार ते साडेचार महिन्यांचा कलावधी जातो. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिकाला पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. परिणामी पीक उत्पादन घेण्यास उशीर लागत आहे. यंदा मोसमी पाऊस लांबला आहे, त्यामुळे पिकाला पोषक वातावरण उपलब्ध होत नसल्याने हंगामाला विलंब होईल, असे मत व्यक्त होत आहे.

## पनवेल एज्युकेशन सोसायटीतर्फे गुणवंतांचा सत्कार व व्यवसाय मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एज्युकेशन सोसायटी संचालित याकुब बेग हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, पीईएस इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, नॅशनल उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज तसेच अंगलो उर्दू हायस्कूल बारापाडा या शाळांतील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या सत्कार संस्था संचालित याकुब बेग हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त पंकज डहाने, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक लालसिंघ राजपूत, पनवेल पोलीस निरीक्षक शिंदे यांच्या





उपस्थितीत आणि पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांच्या अध्यक्षेतेखाली झाला.

संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी यांच्यातर्फे संस्थेच्या शाळामधून ९३.२० टक्के गुण मिळवून दहावीमध्ये प्रथम येणाऱ्या तैवा एम. अर्शद पटेल या विद्यार्थिनीला रोख एक लाख रुपयांचे पारितोषिक, ९३ टक्के गुण मिळवून प्रथम येणाऱ्या मसिरा सादिक शेख या विद्यार्थिनीला संस्थेतर्फे रोख २५ हजार रुपये, तसेच अंगलो उर्दू हायस्कूल बारापाडा शाळेतून प्रथम आलेल्या विद्यार्थिनीलासुद्धा संस्थेतर्फे २५ हजार रुपये रोख देऊन सत्कार करण्यात आला. इतर २४ गुणवत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले.

गरजू विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांच्यातर्फे वह्या, पुस्तके तसेच गणवेश वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे पंकज डहाने यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा उपयोग कशा पद्धतीने करणे गरजेचे आहे याबद्दल मार्गदर्शन केले. सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक लालसिंघ राजपूत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी पनवेल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अब्दुल मुकीत अब्दुल लतीफ काझी, सचिव मोहम्मद नूर हसनमिया पटेल, याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेजचे चेअरमन असिफ हसन करेल, अंगलो उर्दू हायस्कूल बारापाडाचे चेअरमन नवीद अब्दुल कादिर पटेल, नेशनल उर्दू हायस्कूल तळोजाचे चेअरमन साजिद नासीर पटेल, संस्थेचे सदस्य निसार अब्दुल हमीद पटेल, अझीम शब्बीर मुल्ला, जव्वाद मुकीत काझी, यासिर रइस दाखवे, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**

मान्सूचा कालावधी पुढे सरकल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांना खरीप हंगाम नियोजनाबाबत मागदर्शक सूचना केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागानुसार राज्यात मान्सूनचे आगमन साधारणतः ७ जूनच्या दरम्यान होते. या वर्षी ११ जून रोजी कोकण विभागामध्ये मान्सूनचे आगमन झालेले आहे, परंतु राज्यात उर्वरित ठिकाणी मान्सूनचे आगमन झाले नाही. सद्य:स्थितीत २१ जूनअखेर सरासरी पर्जन्यमान १४५.३ मिमी असून प्रत्यक्षात मात्र १६.७ मिमी (सरासरीच्या ११.५ टक्के) पाऊस पडलेला आहे तसेच खरीप हंगामातील सरासरी पेरणीचे क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून २१ जूनअखेर प्रत्यक्षात १.९८ लाख हेक्टर (१.३० टक्के) पेरणी झाली आहे.



महाराष्ट्र राज्यात मान्सून आगमनास विलंब होत असल्याने शेतकरी चिंतेत आहे. या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांनी पेरणी करताना काय दक्षता घ्यावी तसेच आपत्कालीन पीक परिस्थितीत काय नियोजन करावे याबाबत कृषी मंत्री महोदयांनी, अपर मुख्य सचिव कृषी आयुक्त कृषी, सर्व कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि भारतीय हवामान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ के. एस. होसाळीकर यांच्या समवेत २१ जून रोजी बैठक घेऊन सर्व संबंधितांबरोबर चर्चा केली. त्यानुसार हवामान बदलामुळे सामान्यपणे पाऊस येण्याचा कालावधी पुढे सरकला आहे. यामुळे नवीन सामान्य पाऊस कालावधी येण्याचा कालावधी २४ ते २५ जून असेल असा अंदाज वेधशाळेने वर्तविला आहे.

हवामान विभागाच्या या अंदाजानुसार २४ व २५ जूननंतर अरबी समुद्रावरून येणाऱ्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांना गती मिळण्याची शक्यता असल्याने सर्वदूर चांगला पाऊस पडण्यास सुरुवात होईल, अशी अपेक्षा आहे.

या संदर्भात शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये, सर्वसामान्यतः ८० ते १०० मिमी पाऊस पडल्याशिवाय पेरणी करू नये.

लवकर येणाऱ्या व पाण्याचा ताण सहन करणाऱ्या वाणांची लागवडीसाठी निवड करावी, मान्सूनचे आगमन उशिरा होत असल्याने शेतकऱ्यांनी धूळ पेरणी करू नये, पेरणी करताना साधारणपणे २० टक्के जादा बियाणांचा वापर करावा, सलग संपूर्ण क्षेत्रावर एकच पीक न घेता आंतरपीक पद्धतीचा वापर करावा, पेरणी करताना रुंद सरी वरंबा पद्धतीने (बीबीएफ) पेरणी करावी, जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन करण्यासाठी आच्छादन (मल्चिंग) सारख्या तंत्राचा वापर करावा.

हवामान खात्यामार्फत पुढील पाच दिवसांचा पावसाचा अंदाज दिला जातो. या पावसाच्या अंदाजाची माहिती प्रसिद्धीमाध्यमांद्वारे शेतकऱ्यांना देण्यात येईल. कृषी विद्यापीठ, कृषी विद्यापीठांचे संशोधन केंद्र व कृषी विज्ञान केंद्र यांच्या सहाय्याने स्थानिक आपत्कालीन पीक नियोजन करण्यात येत आहे.

क्षेत्रीय यंत्रणांना या माहितीचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात मान्सूनचा अंदाज घेऊन पेरणीच्या वेळी पुरेशा प्रमाणात उत्तम दर्जाचे बी-बियाणे, खते व किटकनाशके शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार व रास्त दरात उपलब्ध करून देण्याची खबरदारी कृषी विभागाकडून घेतली जात आहे. शेतकऱ्यांना जिल्ह्यात खरीप हंगामासाठी लागणाऱ्या कृषी निविष्ठांचा साठा उपलब्ध होइल यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. शेतकरी (१८००-२३३४०००) या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

शेतकऱ्यांनी कृषी विभागामार्फत देण्यात येत असलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

## विश्वशांतीसाठी पेणमध्ये श्री स्वामी जगन्नाथ रथयात्रा

**पेण : प्रतिनिधी**

विश्वशांती व मानवतेच्या कल्याणाकरिता पेणमध्ये इस्कॉन संस्थेच्या वतीने श्री स्वामी जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील उद्योजक कल्पेश शहा यांच्या निवासस्थानी श्री स्वामी जगन्नाथांची विधिवत पूजा करून रथयात्रा काढण्यात आली.



ओडिशातील जगन्नाथ पुरी येथील जगन्नाथ यात्रा जगभर प्रसिद्ध आहे. इस्कॉन संस्था पेणमध्ये कार्यरत आहे. दर रविवारी व एकादशीच्या दिवशी भगवतगीतेवर प्रवचन, हरिनाम, कीर्तन राधाकृष्ण मंदिरात केले जाते. उद्योजक कल्पेश शहा इस्रायल आळी यांच्या निवासस्थानापासून रथयात्रा निघाली. हरिनाम संघ कीर्तन व शंख नादात रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाविकांनी फटाक्यांची आतिषबाजी केली. श्रीदास गदाधर प्रभू यांच्या मार्गदर्शनाखाली श्री इस्कॉन मंदिराचे करुणामय निधी श्रीदास जगन्नाथ प्रभू यांच्या स्वागत कीर्तन व हरिनाम प्रवचनाचा भाविकांनी लाभ घेतला.

रथयात्रा राजू पोटे मार्गावरून पेण नाका, बाजारपेठ मार्गे लक्ष्मीनारायण मंदिरात नेण्यात आली. या रथयात्रेत वैष्णवी शहा, प्राची म्हात्रे, रवी म्हात्रे, मनीषा शहा, पायल सुर्वे, सुरेश शहा, प्रभास दास, अंजली जाधव, संजय मिरकुटे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाली होती. लक्ष्मीनारायण मंदिरात पोहोचल्यानंतर महापुष्प अभिषेक, पंचांग आरती, हरिनाम संग कीर्तन तसेच ५६ भोग महाप्रसाद आदी कार्यक्रम पार पडले. या महाप्रसादाचा शेकडो भक्तांनी लाभ घेतला.

## अलिबागेत स्वच्छता मोहीम; 'जेएसएम'चा सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत अलिबाग नगर परिषदेतर्फे शुक्रवारी (दि. २३) अलिबाग शहरात स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले. या अभियानात जेएसएम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक सहभागी झाले होते.

रस्त्यावर इतरत्र पसरलेला प्लास्टिक कचरा, कागदी कचरा आणि पालापाचोळा विद्यार्थ्यांनी स्वच्छ करून नागरिकांसमोर आदर्श ठेवला. त्याचप्रमाणे नागरिकांनी ओला कचरा, सुका कचरा व हानिकारक कचरा वेगळा करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील आणि जेएसएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले. सर्व नागरिकांनी आपले घर, परिसर व शहर स्वच्छ ठेवावे, असे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी आठवले आणि प्रा. पंकज घरत यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान यशस्वी झाले.



## कर्जत तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योगाचे धडे



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तहसीलदार कार्यालयातील कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी, मंडल अधिकारी, तलाठी आदींनीही जागतिक योग दिनानिमित्त योगाचे धडे घेतले. योग शिक्षक सुनील मोरे यांनी तब्बल एक तास उपस्थितांना प्रशिक्षण देऊन प्रत्येक योग प्रकाराची माहिती दिली.

तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणात योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी त्यांच्याच कार्यालयातील योग शिक्षक सुनील मोरे यांचे स्वागत करून योग निरोगी जीवनासाठी कसा लाभदायक आहे हे स्पष्ट केले.

या वेळी नायब तहसीलदार सोपान बाचकर, अव्वल कारकून बाळू बुरसे, गोरेगावकर, अप्पा राठोड, कूळ वहिवाट अव्वल कारकून संदीप गाढवे, विकास राठोड, माधुरी पाटील आदी उपस्थित होते.

## सैनिकी विश्रामगृह येथे विविध सुविधा


**अलिबाग : जिमाका**

सर्व माजी सैनिक, सेवारत सैनिक तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता अलिबाग गोंधळपाडा येथे जंजिरा सैनिकी विश्रामगृह कार्यरत आहे. माजी सैनिक, सेवारत सैनिक तसेच इतर नागरिक यांना त्यांच्या सैन्यातील हुद्द्याप्रमाणे सुविधा उपलब्ध असून राहण्याचे दर आकारण्यात येतात.

विश्रामगृहात अतिमहनीय, वातानुकूलित तसेच डॉरमेट्री कक्ष तसेच खानपान सेवा वाजवी दरामध्ये उपलब्ध आहे. विश्रामगृहाच्या आवारात खुला हॉलदेखील उपलब्ध आहे. हा हॉल तसेच कक्ष मुलांचे वाढदिवस, मॅरेज निव्हर्सरी, कार्यालयीन बैठका इत्यादीकरिता उपलब्ध राहतील. इच्छुकांनी (९०२१२७३३१०), (९१७५०६२८७७) या क्रमांकावर संपर्क साधावा.

## मृगगडावरील पाण्याचे टाके झाले मोकळे
### जल साठवणुकीसाठी दुर्गवीर प्रतिष्ठानचे श्रमदान





**पाली : प्रतिनिधी**

दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे सुधागड तालुक्यातील मृगगडावर श्रमदान मोहीम राबवून पाण्याचे मोठे टाके पूर्णपणे स्वच्छ करण्यात आले आहे. या साफसफाईमुळे पावसाळ्यात टाक्यात पाणी साठवून उन्हाळ्यात गडावर येणाऱ्या दुर्गप्रेमींचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

मागील अनेक वर्षांपासून दुर्गवीर प्रतिष्ठान अपरिचित आणि दुर्लक्षित असलेल्या किल्ल्यांवर संवर्धनाचे कार्य करीत आहे. अशाच दुर्लक्षित व अपरिचित मृगगडावर दुर्गवीरचे संवर्धनाचे काम सुरू आहे. अनेक मोहिमा झाल्या, पण या टाक्याचा तळ गाठला गेला नव्हता. अखेर हे कार्य आता पूर्ण झाले आहे.

दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हासुरकर यांनी सांगितले की, २०१२ साली मृगगडावरील भले मोठे टाके अगदी काठोकाठ चिऱ्यांनी भरून बंद होते. ते श्रमदानातून मोकळे केले आहे. दुर्गवीर एकनाथ अस्वले व रुपाली अवघडे यांच्या नेतृत्वाखाली या टाक्यातील शेवटची मोहीम पार झाली. पुढील काळात यातील पाणी साठवणूक शास्त्रोक्त पद्धतीने कसे होईल यावर काम करणार आहोत.

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना जाणून घेऊया या लेखातून...**

बळीराजा राज्यातील महत्त्वाचा घटक आहे. राज्यातील शेतकरी, कष्टकरी सर्वसामान्य जनतेचा आर्थिक आधार बळकट करणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, या बाबीसाठी राज्य शासन सकारात्मक निर्णय घेत आहे. राज्याच्या २०२३-२४ या अर्थसंकल्पातून शेतकरी आणि कष्टकरी यांच्यासाठी भरीव तरतूद केली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी, प्रगतीसाठी राज्य शासन सदैव कार्यरत आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबत योग्य पाठपुरावा करुनही विमा कंपनीच्या कार्यपद्धतीत सुधारणा होत नसल्याने या योजनेमध्ये सुधारणा करुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास १९ एप्रिल २०२३च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे. यामध्ये अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी दोन लाखांचे सानुग्रह अनुदान मिळणार आहे. यासाठी शासनाने या वर्षी १२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघाग्रस्त शेतकऱ्यांस, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्यासाठी राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य (आई-वडील, शेतकऱ्यांची पती, पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्ष वयोगटातील एकूण दोन जणांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या प्रयोजनार्थ कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या एका सदस्यांमध्ये आई-वडील, शेतकऱ्यांची पती, पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यांचा समावेश ग्राह्य धरण्यात येईल. कृषि गणनेनुसार निर्धारित केलेल्या वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य असे एकूण दोन जणांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ देय आहे.

**देय लाभाचा तपशील :** अपघाती मृत्यू झाल्यास रुपये दोन लाख, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी झाल्यास रुपये दोन लाख, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास रुपये दोन लाख व




अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास रुपये एक लाख आर्थिक सहाय्य देय आहे.

**लाभासाठी पात्रता :** या योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसांच्या २४ तासांसाठी ही योजना लागू आहे. या कालावधीत वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य यापैकी कोणत्याही व्यक्तीला केव्हांही अपघात झाला किंवा अपंगत्व आले तरीही ते या योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहतील. या योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकऱ्याने, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभार्थी गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभास पात्र ठरणार नाहीत.

**अपघाताचे स्वरुप :** या योजनेचा लाभ घेण्यासाठी रस्ता, रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरुन पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचूदंश, नक्षलाईटकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या हल्ल्यामुळे, चावण्यामुळे जखमी, मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, दंगल व अन्य कोणतेही अपघात अशा या अपघाताचा समावेश आहे. तसेच नैसर्गिक मृत्यू, विमा कालावधीपूर्वीचे अपंगत्व, आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्णक स्वत:ला जखमी करून घेणे, गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात, अमली पदार्थाच्या अंमलाखाली असताना झालेला अपघात, भ्रमिष्टपणा, शरीरांतर्गत रक्तस्त्राव, मोटार शर्यतीतील अपघात, युद्ध, सैन्यातील नोकरी, जवळच्या लाभधारकाकडून खून या बाबींचा या योजनेत समावेश असणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे :** सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गाव कामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. ६-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, शेतकऱ्यांच्या वयाच्या पडताळणीसाठी शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र तसे ज्या कागदपत्राआधारे ओळख, वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे, प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, पोलीस पाटील माहिती अहवाल, अपघाताच्या स्वरुपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे इत्यादी कागदपत्रे गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जेव्हा शेतकऱ्यांचे अपघाताचे प्रकरण निदर्शनास येईल तेव्हा संबंधित अपघातग्रस्त शेतकरी, शेतकऱ्यांचे वारसदार यांनी सर्व निर्धारित कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे ३० दिवसांच्या आत सादर करावेत. यासाठी कृषी विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी संबंधितांना मार्गदर्शन करतील. तसेच या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

## वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी भारतीय संघ जाहीर

# युवा खेळाडूंना संधी






**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी शुक्रवारी (दि. २३) भारताच्या वन डे व कसोटी संघाची घोषणा करण्यात आली. भारतीय संघ तेथे दोन कसोटी, तीन वन डे व पाच ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यासाठी युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे.

यशस्वी जैस्वाल व ऋतुराज गायकवाड यांच्यासह मुकेश कुमार, नवदीप सैनी यांची कसोटी संघात एन्ट्री झाली आहे. अजिंक्य रहाणेकडे पुन्हा उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. चेतेश्वर पुजाराला डच्चू दिला गेलाय, तर वन डे संघात संजू सॅमसन व ऋतुराज परतले आहेत.

**कसोटी संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, अजिंक्य रहाणे (उपकर्णधार), केएस भरत, इशान किशन, आर. अश्विन, रवींद्र जडेजा, शार्दूल ठाकूर, अक्षर पटेल, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जयदेव उनाडकट, नवदीप सैनी.

**वन डे संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, संजू सॅमसन, इशान किशन, हार्दिक पांड्या, शार्दूल ठाकूर, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, जयदेव उनाडकट, मोहम्मद सिराज, उम्रान मलिक, मुकेश कुमार.


# विंडीजचा नेपाळवर दणदणीत विजय

## शाई होप, निकोलस पुरनची शतके

**हरारे : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषकाच्या पात्रता फेरीत गुरुवारी वेस्ट इंडिज आणि नेपाळ यांच्यात सामना झाला. या सामन्यात वेस्ट इंडिजने नेपाळवर १०१ धावांनी दणदणीत विजय नोंदवला. विंडीजकडून शाई होप, निकोलस पुरन यांनी शतकी खेळी केली. या विजयासह हा संघ अ गटात गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचला आहे. त्याचबरोबर शाई होपने शतक झळकावून विराट कोहलीच्या शतकांचा मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

चौथ्या क्रमांकावर फलंदाजी आलेल्या वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होपने १२९ चेंडूंत १३२ धावांची शानदार शतकी खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून १० चौकार आणि तीन षटकार निघाले. होपचे वनडेतील हे १५वे शतक आहे. होपने अवघ्या १०५ डावांत



त्याने ही कामगिरी केली. यासोबतच त्याने वनडेमध्ये सर्वांत कमी डावांत १५ शतके झळकावण्यात विराट कोहलीला मागे टाकले आहे.

या विक्रमाच्या यादीत बाबर आझम पहिल्या क्रमांकावर आहे. बाबरने केवळ ८३ डावांत १५ शतके पूर्ण केली होती. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज हाशिम आमला या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ८६ डावांत १५ शतके झळकावली. आता या यादीत शाई होप तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. त्यामुळे विराट कोहली चौथ्या क्रमांकावर घसरला आहे. विराटने १०६ डावांत एकदिवसीय क्रिकेटमधील १५ शतके पूर्ण केली होती.

शाई होपने २०१९च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर सर्वाधिक शतके करण्याच्या बाबतीत बाबर आझमला मागे टाकले आहे. गेल्या विश्वचषकानंतर होपचे हे नववे शतक आहे. त्याचवेळी २०१९च्या एकदिवसीय विश्वचषकापासून बाबरने आठ शतके झळकावली आहेत.

२०१६ मध्ये वनडेमध्ये पदार्पण करणाऱ्या शाई होपने आतापर्यंत १०५ डावांमध्ये ५०.८०च्या सरासरीने ४६७४ धावा केल्या आहेत. तो एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक सरासरी धावा करणारा कॅरेबियन फलंदाज आहे. या अगोदर हा विक्रम व्हिव्ह रिचर्ड्सच्या नावावर होता.

सामन्याबद्दल बोलायचे तर, प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ५० षटकांत सात गड्यांच्या मोबदल्यात ३३९ धावा केल्या होत्या. होपने १३२, तर पूरनने ११५ धावांची खेळी केली. या जोडीने चौथ्या विकेटसाठी २१६ धावांची भागीदारी केली. त्याचवेळी नेपाळचा संघ ४९.४षटकांत २३८ धावांत गारद झाला. त्यांच्याकडून आरिफ शेखने ६३ आणि गुलशन झाने ४२ धावा केल्या. या सामन्यात नेपाळकडून ललित राजवंशीने तीन बळी घेतले. त्याचवेळी जेसन होल्डरने वेस्ट इंडिजकडून तितक्याच विकेट घेतल्या.

## ‘आरटीआयएससी’च्या निभिष चौधरीला स्केटिंग चॅम्पियनशीपमध्ये सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा सदस्य निभिष चौधरी याने मुंबई युनिव्हर्सिटी येथे झालेल्या मान्सून इनडोअर ओपन स्पीड स्केटिंग चॅम्पियनशीपमध्ये सहभागी होऊन सुवर्णपदक पटकाविले.

याबद्दल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे व्यवस्थापक प्रणित गोंधळी, सहव्यवस्थापक शामनाथ पुंडे यांच्या उपस्थितीत पॅट्रोन मेंबर अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते निभिष चौधरी याचा सन्मान करण्यात आला.



## ‘धोनीमुळे सीएसकेने अजिंक्यला दिली संधी’

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जला पाचव्यांदा या लीगचा चॅम्पियन बनण्याचा मान मिळाला. या हंगामात धोनीने टीम इंडियाचा वरिष्ठ फलंदाज अजिंक्य रहाणेला दिलेली जबाबदारी त्याने योग्य पद्धतीने बजावली. रहाणेच्या आयपीएल कामगिरीमुळे त्याला कसोटी संघातही पुनरागमन करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर अजिंक्य रहाणेही मिळालेल्या संधी सोने केले. अजिंक्यची सीएसके संघात कशी निवड झाली याबाबत सीईओ काशी विश्वनाथन यांनी माहिती दिली आहे.

अजिंक्य रहाणे गेल्या अनेक वर्षांपासून भारतासाठी एकदिवसीय आणि टी-२० सामने खेळत नाही तसेच कसोटी संघात त्याचे पुनरागमनही जवळपास दीड वर्षाने झाले, परंतु त्याने या संधीचा पुरेपूर फायदा घेतला आणि आपल्या क्षमतेनुसार सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. डब्ल्यूटीसी सामन्यात रहाणेने भारताकडून सर्वाधिक धावा केल्या होत्या.

# अखेर वीरेंद्र सेहवागने मौन सोडले

## मुख्य निवडकर्ता बनण्यासाठी ऑफर नसल्याचा खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टीम इंडियाच्या निवड समितीसाठी गुरुवारी अर्ज मागवले. निवड समिती प्रमुखपदासाठी वीरेंद्र सेहवागला विचारणा केली होती, असे वृत्त बीसीसीआयच्या सूत्रांचा हवाला देऊन प्रसिद्ध करण्यात आले होते, पण भारताचा माजी सलामीवीर सेहवागने हे वृत्त फेटाळून लावले अन् बीसीसीआयकडून कुणीच निवड समिती प्रमुख बनण्याची विचारणा केली नसल्याचे स्पष्ट केले.

फेब्रुवारीमध्ये चेतन शर्मा यांना एका स्टिंग ऑपरेशनमुळे निवड समिती प्रमुखपदावरून काढून टाकण्यात आले होते. या स्टींग ऑपरेशनमध्ये त्यांनी भारतीय खेळाडू आणि संघ निवडीबद्दल गुप्त माहितीवर चर्चा केली



होती. तेव्हापासून बीसीसीआय निवड समिती प्रमुखाशिवाय आहे. जेव्हा बीसीसीआयने सेहवागला अशा ऑफरच्या शक्यतेबद्दल विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले, नाही.

चेतन शर्मा यांची हकालपट्टी केल्यापासून, माजी भारतीय खेळाडू शिव सुंदर दास पॅनेलचे अंतरिम मुख्य निवडकर्ता म्हणून काम करत आहेत. बीसीसीआयचे इतर निवडकर्ते एस शरथ (दक्षिणमधून), सुब्रतो बॅनर्जी (केंद्रातून) आणि सलील अंकोला (पश्चिमेकडून) आहेत.

बीसीसीआयने आता निवड समितीसाठी जाहिरात पोस्ट केली आहे. निवडलेला उमेदवार कदाचित समितीचा नवीन मुख्य निवडकर्ता म्हणून कार्यभार स्वीकारेल. अर्जदाराने एकतर ३० प्रथम श्रेणी सामने, सात कसोटी किंवा १० वन डे सामने आणि २० प्रथम श्रेणी सामने खेळलेले असावेत. त्याने किमान पाच वर्षांपूर्वी निवृत्ती घेतलेली असायला हवी. या पदासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून आहे. नवीन निवडकर्त्याने मजबूत बेंच स्ट्रेंथची योजना आखणे आणि तयार करणे आणि प्रत्येक फॉरमॅटमध्ये संघासाठी कर्णधाराची नियुक्ती करणे अशी अपेक्षा केली जाईल.

# पाकिस्तानच्या आडमुठेपणामुळे वर्ल्डकपच्या वेळपत्रकास उशीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

या वर्षाच्या शेवटी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अधिकृत वेळापत्रकाची सर्व क्रिकेटप्रेमी आतुरतेने वाट पाहत आहेत. आशिया चषकाबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) यांच्यातील वादावर तोडगा निघाल्यानंतर आता विश्वचषकाबाबतही सर्व काही स्पष्ट होईल, अशी सर्वांना अपेक्षा होती, मात्र आता पीसीबीच्या आठमुठेपणामुळे विश्वचषक वेळपत्रकास उशीर होत आहे. त्यामुळे बीसीसीआयने संताप व्यक्त केला.

गेल्या आठवड्यात आयसीसीने विश्वचषक वेळापत्रकाचा मसुदा बीसीसीआय आणि पीसीबीला पाठवला होता तसेच त्यावर आपला अभिप्राय देण्यास सांगितलेही होते. भारताने त्या वेळापत्रकाच्या मसुद्यावर कोणताही आक्षेप नाही असे कळवले, मात्र पीसीबीने आपल्या मॅचअपमध्ये दोन मोठे बदल करण्याची विनंती केली आहे, ज्यामुळे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यास आणखी विलंब होत आहे.

बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ‘इनसाइडस्पोर्ट्स’ला सांगितले की, पाकिस्तानच्या आडमुठेपणामुळेच वर्ल्डकपच्या वेळपत्रकाला उशीर होत आहे. पीसीबी त्यांना हवे ते सांगू शकते, पण वस्तुस्थिती अशी आहे की वेळापत्रक जाहीर होण्यास उशीर होण्यास पीसीबी

### बीसीसीआयचा संताप




जबाबदार आहे. पूर्वी पाकिस्तान अहमदाबादमध्ये खेळायला तयार नव्हता. आता चेन्नईत खेळायला तयार नाही. त्यांना सर्वच ठिकाणी असुरक्षितता वाटते, ते नेहमीच दुसऱ्याला त्रास देतात.

सुरक्षेच्या कारणास्तव अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताचा सामना होणार नाही यावर पीसीबी सुरुवातीपासूनच ठाम होते. त्याऐवजी त्यांना चेन्नईच्या नवीन स्टेडियममध्ये भाराताविरुद्ध खेळायचे आहे, मात्र मसुदा वेळापत्रक मिळाल्यानंतर पाकिस्तानने आता बीसीसीआयला त्यांच्या अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्याचे ठिकाण चेन्नईहून बदलण्याची विनंती केली आहे.

पाकिस्तान क्रिकेट संघाला चेन्नईतील फिरकीला अनुकूल खेळपट्टीवर अफगाणिस्तान संघाविरुद्ध खेळायचे नाही, कारण आम्हाला ते सोयीस्कर होणार नाही, असा दावा पीसीबीने केला आहे. दुसरीकडे पीसीबीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या त्यांच्या सामन्याचे ठिकाण बदलून बंगळुरूमध्ये करण्याची मागणी केली आहे. सोप्या भाषेत सांगायचे, तर पीसीबीला बंगळुरूमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध आणि चेन्नईमध्ये ऑस्ट्रेलिया आणि भाराताविरुद्ध सामने खेळायचे आहेत, मात्र बीसीसीआयने ही विनंती फेटाळून लावली. आता आयसीसी या प्रक्रियेत मध्यस्थी करीत आहे.

### ‘पीसीबी’चे नखरे

*बीसीसीआय आणि आयसीसीने सर्व हट्ट धुडकावून लावल्यानंतर आता पीसीबीने नवा खेळ सुरू केला आहे. पाकिस्तान सरकार परवानगी देतील, तेव्हा आम्ही वर्ल्डकप खेळण्यासाठी भारतात येऊ, अस पीसीबीचे म्हणणे आहे. अशातच पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून याबाबत प्रथमच प्रतिक्रिया आली आहे. भारतात होणाऱ्या वर्ल्डकप स्पर्धेत संघाच्या सहभागाबाबत आम्ही मूल्यांकन करीत असल्याची प्रतिक्रिया त्यांच्याकडून आली आहे. पीसीबीच्या या नखऱ्यांमुळे वर्ल्डकप स्पर्धेच्या वेळापत्रकाची घोषणा होण्यास विलंब झाला आहे.*

## पीटर ॲलन यांचे निधन

**सिडनी : वृत्तसंस्था**


ऑस्ट्रेलिया क्रिकेटला मोठा धक्का बसला आहे. एका डावात १० बळी घेणारा गोलंदाज पीटर ॲलन यांचे निधन झाले. पीटर यांनी वयाच्या ८७व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.

क्वीन्सलँडमध्ये १९३५ मध्ये जन्मलेले पीटर हे वेगवान गोलंदाज होते. क्वीन्सलँडसाठी सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. १९६५मध्ये ॲशेस मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यातून त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यांनी ऑस्ट्रेलियासाठी फक्त एकच सामना खेळला असला तरी दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडल्यानंतर ते शेफिल्ड शिल्डमध्ये खेळण्यासाठी परतले आणि क्विन्सलँडसाठी जानेवारी १९६६मध्ये व्हिक्टोरियाविरुद्ध पहिल्या डावात ६१ धावांत १०



बळी घेतले. ऑस्ट्रेलियातील हा तिसरा सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रम ठरला. प्रथम श्रेणी क्रिकेटच्या एका डावात १० बळी घेणाऱ्या तीन ऑस्ट्रेलियन गोलंदाजांपैकी ते एक होते.

## वेस्ट इंडिज दौऱ्यापूर्वी विराट पत्नीसोबत नेदरलँडसमध्ये



**ॲम्सटरडॅम : वृत्तसंस्था**

भारतीय संघ पुढील महिन्यात वेस्ट इंडिजचा दौऱ्यावर जाणार आहे. याआधी टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली पत्नी अनुष्का शर्मासोबत सुटी घालवण्यासाठी नेदरलँडला पोहचला आहे. विराट कोहली आणि अनुष्का शर्मा गुरुवारी नेदरलँड्समध्ये चाहत्यांसोबत फोटो काढताना दिसले. हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

या वेळी किंग कोहली पांढऱ्या हाफ टी-शर्टमध्ये दिसला. यासोबतच त्याने टोपी आणि चष्माही घातला होता, तर अनुष्का शर्मा पांढऱ्या रंगाच्या ड्रेसमध्ये दिसली. दोघांनी चाहत्यांसोबत फोटोही काढले.

खरेतर विराट आणि अनुष्का लंडनमध्ये कृष्णा दास यांच्या कीर्तनात सहभागी झाले होते. विराट आणि अनुष्काने यापूर्वीही अनेक धार्मिक स्थळांना भेट दिली आहे. त्यांनी मध्य प्रदेशातील उज्जैन येथे महाकालचे दर्शन घेतले. त्यानंतर दोघेही वृंदावनला गेले होते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com